
# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे अधिकृत मासिक




श्रीसाईबाबा जन्माष्टमीचा उत्सव साजरा करीत व दुसऱ्या दिवशी
दहीहंडीचा जंगी रंजक कार्यक्रम द्वारकामाईत होत असे

ऑगस्ट १९८४) (किंमत १ रु.



माननीय श्री. सोनार साहेब जज्ज सिटी सिव्हिल व सेशन्स कोर्ट शिरडीच्या डॉरमेटरी बिल्डिंगचे उदघाटन करताना



श्री साईनाथ रुग्णालयातील नवीन ऑपरेशन थिएटर

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा

वर्ष ६३ वे ) किंमत १ रुपया ( अंक ५

श्रीसाईलीला ऑगस्ट १९८४

दूरध्वनी ८८२२५६१

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

कुठेंही असा कांहींही करा ।
एवढें पूर्ण सदैव स्मरा ।
कीं तुमच्या इत्थंभूत कृतीच्या खबरा।
मज निरंतरा लागती ॥१४३॥
येणें निर्दशित ऐसा जो मी ।
तोचि मी सर्वांच्या अंतर्यामी ।
तोचि मी हृदयस्थ सर्वगामी ।
असे मी स्वामी सकळांचा ॥१४४॥
भूतीं सबाह्याभ्यंतरीं ।
भरूनि उरलों मी चराचरीं ।
हे सकळ सूत्र ईश्वरी ।
सूत्रधारी मी त्याचा ॥१४५॥
मी सकळ भूतांची माता ।
मी त्रिगुणांची साम्यावस्था ।
मीचि सकलेंद्रिय प्रवर्ता ।
कर्ता धर्ता संहर्ता ॥१४६॥
लक्ष लावी जो मजकडे ।
नाहीं तयासी कैंचेंही सांकडे ।
तोचि माझा जैं विसर पडे ।
माया कोरडे उडवी तैं ॥१४७॥
—श्री साईसच्चरित अध्याय ३ रा.

## सुविचार

उदये सविता रक्तो
रक्त श्चास्त मने तथा
सम्पत्तौ च विपत्तौच
महतामेकरूपता ॥

सुखाच्या किंवा दुःखाच्या कोणत्याही परिस्थितीत सज्जनांची मनोवृत्ती कशी समान असते ते या सुभाषितात सांगितलेले आहे.

— सूर्य उगवण्याचेवेळी लाल लाल असतो तसाच तो मावळण्याच्या-वेळीही लालच असतो. त्याचप्रमाणे वैभवात किंवा संकटात सज्जनांची वागणूक सारखीच असते.

# अनुक्रमणिका ऑगस्ट १९८४


१) संपादकीय — प्रेमाचा पाया
२) सदगुरु साईबाबा व नानक देवजी — श्री. लक्ष्मणराव रापतवार.
३) श्रीक्षेत्र गणपतीपुळे — श्री. शरदचंद्र शेरे.
४) साईकृपेने गळा खुलला — प्रा. मालती केळकर.
५) लेखनसेवा ही शब्दरूप ईश्वराची सेवा — प्रा. र. श्री. पुजारी.
६) टिळा लावला नि साई धावला — सौ. काननबाला म्हात्रे.
७) अंतर्मनातील दीपोत्सव — श्री. वसंत प्रधान
८) मुलीचा ताप गेला — श्री. जयवंत पांढरे.
९) साईबाबांची द्वारकामाई — श्री. रमेश चव्हाण
१०) चंचल मुलगा परदेशात स्थिर — सौ. सीताबाई खानोलकर.
११) आत्मोन्नती — श्री. चंद्रकांत गरगटे
१२) साईकृपेचा अनुभव — सौ. भावना बिडीकर.
१३) ईद मुबारक व रामराम — श्री. मोहन सोनवणे
१४) जया मनी जैसा भाव — श्री. लक्ष्मण खांडेकर.
१५) दिघे काकांना बाबांचे दर्शन असे — श्री. वि. स. महाबळेश्वरकर
१६) साईशक्ति महान — श्री. राजेश खुरतले
१७) पिठलं भाकरी — बाबांचा प्रसाद — श्री. सुरेंद्र चिटणीस
१८) बाबांचे दर्शन कुणाकुणास कसे — श्री. माधव गोरे
१९) ही सद्‌गुरु कृपाच — श्री. स. व्यं. कुलकर्णी
२०) मनोभावे करावी तव सेवा — डॉ. शरद हर्डीकर.
२१) तवपदीचा जोडा — डॉ. सौ. सुमती खानविलकर
२२) श्रीसाई स्तवनांजली — डॉ. विद्यासागर कांबळे.
२३) हाच मंत्र — डॉ. इंदूताई नाईक
२४) कृतार्थ जीवनाचे गूढ — श्री. जयसिंग वाघरे
२५) मुखी घास घेणार — श्री. प्रकाश परब
२६) आमुची राजधानी — श्री. बाळासाहेब नाडकर्णी.
२७) तळमळतो जीव माझा — श्री. नथुराम जोशी.
२८) शिरडीवृत्त — मे, १९८४


शिवाय शकुंतला जगतकर, अनिल रसाळ, कमल इंगळे, शिला नाडकर्णी व सुभद्रा पाठक.

# प्रेमाचा पाया

स. न. वि. वि.

## संपादकीय

"तुमचा मी भार वाहीन सर्वथा। नव्हे हे अन्यथा, वचन माझे" हे श्रीसाई मुखीचे अनमोल असेच बोल आहेत. पाया भक्कम असला म्हणजे इमारत मजबूत रहाते. भक्ताच्या वैयक्तीक जीवनाचा भार सर्वस्वी वाहून नेण्याचे वचन भगवंतांनी आपणास दिलेले आहे. परंतु त्यापूर्वी भक्ताने बाबांच्या चरणकमली अनन्यभाव ठेवण्यास शिकले पाहिजे.

भक्ताला स्वतःच्या जीवनाची इमारत स्वतःच बांधावी लागते. तेव्हा या इमारतीचा पाया मजबूत करण्याची जबाबदारीही भक्ताचीच असते. मजबूत पाया बांधण्यासाठी दैवी-प्रेमाचा भरपूर साठा भक्तापाशी असल्यास त्यास इतर गोष्टी शोधत बसण्याची यातायात करावी लागत नाहीं, असा सर्व संतमंडळींचा स्वानुभव आहे. विशेष म्हणजे या प्रेमामध्ये त्यांना देवाचा साक्षात्कार झाला.

दैवी प्रेमाचा उगम चित्तामध्ये होत असल्यामुळे बाह्य जगात त्यासाठी वणवण हिंडण्याची जरूर भासत नाहीं. चित्तामधील हे प्रेम बाह्य मनाला प्रसन्नतेची देणगी देत असते. प्रसन्नतेच्या या प्रकाशात बुद्धीला बोध प्राप्त होतो व "बुद्धीचे वैभव अन्य नाही दुजे। एक्या केशिराजे सकळ सिद्धी॥" हे श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील बोल सत्य असल्याचे तिच्या प्रत्ययाला येते. बोधामुळे बुद्धीला ज्ञानाची दिशा दिसू लागताच विचारांना योग्य ते वळण दिले जाते. असे ज्ञानी विचार शब्दाद्वारे बाह्य प्रांगणात येत असताना प्रत्येक शब्दात सद्विचाराचे बीज पेरले जाते. अशा या श्रद्धेमुळे भक्ताचे जीवन शुद्ध व पवित्र बनते पावित्र्य अंगी बाणल्यामुळे व सबूरीचे लेणे प्राप्त झाल्यामुळे प्रत्येक लहान-सहान कर्म सेवाभावाने परिपूर्ण भरले जाते. सेवायुक्त कर्म अर्थातच स्वार्थापासून अलिप्त असते. निःस्वार्थीपणा हा जीवनाचा स्थायीभाव बनला जातो. निःस्वार्थपणे केलेली मानव-सेवा हीच भक्ताची देव-पूजा होते. अशी देव-पूजा देवापर्यंत पोहोचल्याची पावती म्हणून देव भक्तावर कृपेचा

वर्षाव करीत असतो. ईश्वर-कृपेमुळे भक्ताला आनंद व प्रशांतीची कधीच वाण पडत नाहीं. एवढेच नव्हे तर अशा कृपेमुळे भगवान व भक्त एकत्र नांदत असतात. सत्य दृष्टीने पहाता अशा प्रकारचे अद्वयतेचे जीवन जगणे हेच मानवी जीवनाचे उद्दिष्ट आहे.

प्रेमाच्या पायावर उभारलेल्या अशा या भक्ताच्या जीवन-इमारतीत म्हणजेच मंगल मंदिरात भगवान श्रीसाईनाथांचे वास्तव्य कायम स्वरूपाचे असते. दुर्मिळतेने मिळणारा सतत साई-सहवास तो हाच होय. सर्व साई भक्तांना तो लाभो हीच साईपदी प्रार्थना ।

॥ जय भगवान, जय श्रीसाई ॥

## श्रीसाईलीला का. संपादकांचा गौरव

० श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या श्री साईलीला मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी आवृत्ती) व डॉ. श्री. दि. परचुरे (इंग्रजी आवृत्ति) यांची मद्रास येथील 'ऑल इंडिया साईसमाज' या जग प्रसिद्ध संस्थेने 'आजीव सन्माननीय पेट्रन' म्हणून निवड केली आहे. २९-४-८४ रोजी मद्रास येथे झालेल्या संस्थेच्या वार्षिक बैठकीत सर्वानुमते हा निर्णय घेण्यात आला. श्री साईसेवा व प्रचार कार्यात आजवर केलेल्या मौलिक कामगिरी बद्दल हा गौरव करण्यात आला आहे असे समाजातर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात म्हटलेले आहे.

डॉ. गजाननराव दाभोलकर व श्री. सी. एस. राव या आणखीन दोघांनाही हे सन्माननीय पद देण्यात आलेले आहे.

# सद्गुरु साईबाबा व सद्गुरु नानक देवजी यांचे 'समान अवतार कार्य'

—श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार.
किल्ला वॉटर वर्क्स, नांदेड.

० शिरडीचे साईबाबा हे साक्षात् परमेश्वराचेच अवतार. त्यांचे अवतार कार्य मानव समाज सुखी होण्यासाठी, मानवा—मानवात परस्पर प्रेम, परस्पर विश्वास, परस्पर सहकार्य निर्माण करण्या करताच झाला होता. जेव्हां ते प्रथम चांदभाई पटेल यांच्या लग्नाच्या वऱ्हाडा बरोबर शिरडीत दाखल झाले तेव्हां त्याच्या फकीरी बाण्याच्या पोषाखावरून म्हाळसापतीने त्यांना "आवो साईबाबा" म्हणून संबोधिले व तेच नाव आजपर्यंत प्रचलित आहे. त्यांचे खरे नाव कोणते, त्यांची जात कोणती, ते कोठले राहणार, वगैरे संबंधी आजपर्यंत काहीच माहिती उपलब्ध होऊ शकली नाही, परमेश्वरास कोणती जात असू शकणार! सर्व जग ज्याचे घर त्याचे गाव कोणते असणार. परमेश्वर स्वतःच मानवाच्या व जगाच्या उद्धाराकरता साईबाबांच्या रूपाने अवतरले होते.

साईबाबांचे एक निस्सीम भक्त गोपाळ गुंड जे मोजणी खात्यात सर्व्हेअर होते त्यांना संतान नव्हती. साईबाबांच्या आशिर्वादाने त्यांना पुत्र प्राप्ती झाली. त्यास अतिशय आनंद झाला व दरवर्षी शिरडीस यात्रा भरवावी म्हणून त्यांनी आपला विचार तात्या कोते व माधवराव देशपांडे यांना सुचविला. तो सर्वच प्रमुख शिष्यांना पटला. त्यांनी जिल्हा अधिकाऱ्याकडून यात्रेची परवानगी मिळविली परंतु साईबाबांची संमती आवश्यक होती म्हणून सर्व भक्त मंडळी बाबांस आपले मनोगत सांगण्या करता गेले. साईबाबांनी राम नवमीच्या उत्सवाच्या दिवशी यात्रा भरवावी म्हणून संमती दिली व स्वतःही आनंदाने ह्या कार्यक्रमात सहभागी झाले.

त्याच दिवशी मुसलमान भक्तांनीही उरूस भरविण्याची परवानगी मागितली तीही बाबांनी त्यांना स्वखुशीने दिली व तीच परंपरा आजपर्यंत कार्यान्वित आहे. साईबाबांच्या ह्या कृतीमुळे ते रामाचे अवतारही होते तसेच रहीमचेही होते. त्यांना हिंदू मुसलमानांचा जातीयवाद नष्ट करावयाचा होता. नव्हे सर्व जाती धर्माचे जगातील लोक भाऊ भाऊ आहेत हा धडा शिकवाव-

याचा होता. "सबका मालीक एक" परमेश्वरच आहे. त्यानेच हे सर्व जग निर्माण केले आहे. त्याची आराधना मशिदीत "अल्ला हो अकबर" म्हणून करा अथवा मंदिरात "हर हर महादेव" म्हणून करा ती त्यासच पावन होते. मनुष्य धर्म हाच सर्वश्रेष्ठ आहे. माणूसकी सोडून जर तुम्ही कोणते कृत्य कराल तर ते परमेश्वराला पसंत पडत नाहीत. असा उपदेश देण्या करताच त्यांनी मशिदीत वास्तव्य केले. तेथे घंटा ध्वनी करण्यास मनाई नव्हती. स्वत: साईबाबांनी अग्नी प्रज्वलीत करून धुनी पेटविली. कोणत्याही जाती धर्माच्या लोकांना तेथे प्रार्थना करण्यास मनाई नव्हती. बाबा कुरान शरीफही ऐकत असत मोहरमचा सण ही साजरा करीत असत तर रामनवमी, गोकुळ अष्टमी, पोथी पुराणांचे पारायणही आनंदाने ऐकत होते. त्यांची अद्‌भूत लीला व अगाध शक्ती पाहुन ते परमेश्वरी अवतार आहेत अशी लोकांची खात्री पडली. ते महान संत. नेहमी परमेश्वराच्या चरणी लीन ध्यानस्थ बसत. त्यांना हिंदु, मुसलमान, ईसाई, शीख, पारशी सर्व समान दिसत. परस्पर मानवात प्रेम भावना असावी, त्यांच्या अंगी मानव निष्ठा व ईश्वर निष्ठा असावी म्हणून ते स्वत: उपदेश करीत. देवावर श्रद्धा ठेवा, सबूरी ठेवा, सबका मालीक एक है, अल्ला भला करेगा, मी परमेश्वराचा खुदाचा सेवक बंदा गुलाम आहे असे ते स्वत:स म्हणत.

डॉ. अ. ना. देशपांडे लिखित "गुरु नानक यांची अमर कहानी" ह्या पुस्तकात गुरु नानक देवजी बद्दल अतिशय सुंदर वर्णन व माहिती दिली आहे. गुरु नानक हे ईश्वरी अवतार त्यांनाही सर्व मानव जात समान वाटत होती. गुरु नानक देवाजी मौजी बंधनाचे विधिचे संचलन करण्या करिता उपाध्याया जवळ जाऊन बसले आणि त्यांनी उपध्यायास विचारले की हा दोरा कशाचा आहे. हा का घालावा लागतो. त्यावर उपाध्याय म्हणाला हा दोरा ज्यास जानवे म्हणतात हा आपल्या घराणाचा वंश श्रेष्ठतेची खूण आहे. त्याचर नानकानी विचारले हा दोरा कोणी कसा बनविला आहे? हा कधी कुजत नाही काय? ह्यात आध्यात्मिक सामर्थ्य कसे आले? त्यावर उपाध्याय म्हणाला हा दोरा कापसाचा. ब्राम्हणाने मंत्र शक्तीचा उपयोग करून बनविलेला आहे. तो कुजतो तेव्हां त्याच्या जागी नवीन जानवे घालण्यात येते.

गुरु नानकाना जानव्याचे महत्त्व पटले नाही. ब्राम्हणाने दोऱ्याला पीळ देऊन तयार केलेल्या जानव्यात कोणते पावित्र्य आणि सामर्थ्य असणार ते तर कुजते व तुटते म्हणून त्यानी जानवे घालण्यास नकार दिला.

उपाध्यायाने नानकास विचारले की मग तुम्ही कोणते जानवे घालण्यास तयार आहांत त्यावर नानक म्हणाले "जातीवंत दयाभाव हा कापूस त्यातून समाधानाचा दोरा काढावा त्याला सत्य निष्ठेचा पीळ द्यावा, संयम शीलतेच्या गाठी पाडाव्या, म्हणजे ते खरे पवित्र जानवे. मनासाठी हे तयार करावे हे एकदा घातले म्हणजे तुटत नाहीं, कुजत नाहीं, जळत नाही, हरवत नाहीं, हे जानवे जो घालतो तो धन्य होतो." नानकांचे हे बोलणे ऐकून उपाध्यायास त्यांचा अधिकार समजला व हा कोणी साधारण माणूस नसून परमेश्वराचाच अवतार आहे अशी त्याची खात्री पटली.

गुरु नानक देवजी एकदा स्मशानात जाऊन राहिले. त्यांच्या बहिणीस व मेव्हण्यास वाटले की ह्याला भूतबाधा झाली असावी म्हणून त्यांनी एका जाणत्या मौलवीस नेले. मौलवीने विचारले की तुम्हीं घरदार सोडून येथे का बसलात. त्यावर गुरु नानक म्हणाले मानवाची सेवा करण्या करता "माणूस एक आहे कोणी हिंदू नाही कोणी मुसलमान नाहीं." सुलतानपूरच्या नवाबापर्यंत ते विधान पोहचले. नवाबाने गुरु नानकास दरबारात बोलावून स्पष्टीकरण मागितले. तुम्ही हिंदु धर्माबद्दल वाटेल ते म्हणा परंतु मुसलमान धर्मा बद्दल तुम्हास काही अधिकार नाहीं. त्यावर नानकजी म्हणाले, "मी हिंदू नाही आणि मुसलमानही नाहीं. सर्व धर्म मला सारखे वाटतात कारण ते मानवाला ईश्वराकडे घेऊन जातात. त्यावर नवाब म्हणाले असे जर तुमचे मत आहे तर आमच्या बरोबर मशीदीत नमाज पडावयास चला. गुरु नानक, नवाब व काझी तिघे मिळून मशिदीत गेले. शुक्रवार असल्यामुळे मशिदीत मोठा मुसलमानांचा जन समुदाय जमला होता. नमाज सुरू झाली. सर्व मुसलमान कमरेपर्यंत वाकले. पण गुरु मात्र नुसते उभे राहिले. काझीस संताप आला. त्यावर गुरु म्हणाले खाली वाकणे म्हणजे नमाज नव्हे. नवाब साहेबास गुरुने विचारले की तुम्ही खाली वाकले तेव्हां तुमचे लक्ष कंधारास घोडे खरेदी करण्या करता गेलेल्या तुमच्या माणसाकडे होते व काझीसाहेब तुमचे लक्ष वाड्यातील विहिरीत शिंगरू पडेल की काय ह्याकडे होते. अंतरीची खूण पटल्यामुळे दोघांनाही थंड बसावे लागले. तेव्हां गुरु म्हणाले, "प्रीतीच्या मशिदीत, श्रद्धेची सतरंजी पसरा, नेकीने वागा, कुराणातील खरा अर्थ समजा म्हणजे हीच तुमची मक्केची यात्रा आहे असे समजा" असा उपदेश त्यांनी काझीस केला.

गुरु नानक देवजी, परमेश्वरी अवतार होते त्यांचा अधिकार फार मोठा होता. त्यांनी हिंदू मुसलमान दोघांनाहीं परमेश्वर प्राप्तीचा सोपा मार्ग दाखव

दिला. अंतःकरण शुद्ध ठेवावे, दैनंदिन कामे करीत असतांना संसारात राहूनच अखंड परमेश्वराचे नामस्मरण करीत रहावे म्हणजे हळू हळू टप्प्या टप्प्याने आत्म प्रकाश जागृत होतो. नामधारी सज्जन बनू नका तर आपल्या मनाचे शुद्धिकरण करा. गंगास्नानाने अंग धुतले जाते परंतु मनातील मळ तसाच राहतो. तो स्वच्छ होण्याकरिता ईश्वराचे चिंतन, मनन, नामस्मरण हाच एक मार्ग आहे. पापाचे ओझे घेऊन मरण आल्यास त्याचे प्रायश्चित त्यास भोगावे लागते व ह्या जन्म मरणाच्या फेऱ्यातून त्याची सुटका होत नसते. मरण हे नव्या जीवनाचे प्रवेशद्वार आहे असा उपदेश करीत ते सर्व जगात फिरले. अनेक पतितांचा उद्धार केला. गुरु नानक देवजीने मुस्लीम राष्ट्रातही प्रवास केला. बाबर बादशहाने गुरुस शरण जाऊन वर मागितला तेव्हां त्यांनी त्यास तू राज्य करशील म्हणून वरदान दिले परंतु त्यास सौजन्याने राहण्याची मनात दया, क्षमा, शांती ठेवण्याची ताकीद दिली. गुरु नानक देवजींना मोठमोठ्या जादूगारांनीही छळले परंतु जो स्वतः परमेश्वरी अवतार त्यास अपाय तो काय होणार? शेवटी मोठ मोठे जादूगारही त्यांना शरण गेले. गुरु नानक देवजींनी सर्व भारताचे परिभ्रमण केले. लोकांना सत्याचा उपदेश दिला. कोणी हिंदू नाहीं कोणी मुसलमान नाही सर्वांचा परमेश्वर एकच आहे. जगातील सर्व मानव आप-आपसात भाऊ भाऊ आहेत. ईश्वराच्या नामस्मरणाने सर्व काहीं साध्य होते. मोठ मोठ्या मौलवी पंडितांना त्यांनी मोक्ष प्राप्तीचा सोपा मार्ग दाखवून दिला. सर्वजाती धर्मातील लोकात एकोपा निर्माण करण्याची महत्वाची कामगिरी त्यांनी साध्य केली व तीच शिकवण साईबाबांनी ही जगास दिली.

## प. पू. राधाकृष्ण स्वामींची जयंती

० मद्रासच्या ऑल इंडिया साई समाजाचे भूतपूर्व अध्यक्ष व बंगलोरच्या श्री साईस्पिरीच्युअल सेंटरचे संस्थापक प. पू. श्री. राधाकृष्ण स्वामीजी उर्फ श्री साईपादानंद यांची ८० वी जयंती २२–४–८४ रोजी बंगलूर येथील केंद्रात थाटात साजरी करण्यात आली. बंगलोरच्या श्रीरामकृष्ण आश्रमाचे अध्यक्ष श्री स्वामी चिदानंदजी महाराज हे या प्रसंगी अध्यक्ष होते. या प्रसंगी केंद्रात प्रथमोपचार केंद्र, अद्यावत वाचनालय व सध्याच्या केंद्राच्या इमारतीचा आणखीन विकास यांचे बाबतीत शुभारंभ करण्यात आला. यासाठी १५ लाख रु. खर्च येणार असल्याचे केंद्राचे अध्यक्ष श्री. सी. व्ही. भास्करराव यांनी सांगितले.

## निसर्गाच्या कुशीत

# श्री क्षेत्र स्वयंभू गणपतिपुळे

—श्री. शरदचंद्र शेरे.
साईस्मृति, घ. नं. १७७९,
रत्नागिरी — ४१५ ६१२.

० श्रीक्षेत्र गणपतीपुळे हे स्वयंभू स्थान — भाविकांचे श्रद्धा स्थान मुंबई-पासून दक्षिणेस सुमारे ३५० किलोमीटर अंतरावर रत्नागिरी जिल्ह्यात सागर तिरावर वसले आहे. कोकणातले श्री गजाननाचे हे स्वयंभू देवस्थान डोंगराच्या पायथ्याशी असून शहरी गजबजाटा पासून दूर आणि रम्य एकांतात ससेच निसर्गाच्या कुशीत दडलेले आहे.

डोंगराची रम्य पार्श्वभूमी असलेले हे पुरातन गणेश मंदिर पश्चिमाभिमुख असून भोवतालच्या हिरव्या डोंगराची प्रभावळ आणि समोरचा शुभ्र तसाच मऊशार वाळूचा सागर किनारा प्राप्त झालेल्या या निसर्गदत्त वास्तूत भक्तांचे आराध्य दैवत असलेल्या गजाननाने वास केल्यामुळे हे ठिकाण पवित्र, मांगल्याचे प्रतिक झाले आहे.

सुमारे पाचशे वर्षे जुने असलेले हे देवस्थान. अष्टविनायकात याची गणना नसूनही संपूर्ण महाराष्ट्रात विशेष प्रसिद्ध झाले. कारण सांगली, मिरज, जम-खिडी आदि एकेकाळचे पटवर्धन संस्थानिकांचे पूर्वज हरभट पटवर्धन यांनी येथे तपस्या करून आपले संपूर्ण कुटुंब मोठ्या उर्जितावस्थेत आणले. इ. स. १६०० च्या पूर्वी काहीं वर्षे मोंगलाई अंमल चालू असतांना या गावचे खोत भिडे यांचे स्वप्नात श्री गणपतींनी आपण येथे केवड्याचे बनात रहात अस-ल्याचा दृष्टांत दिल्यामुळे हे स्थान शोधून काढण्यात आले.

देवस्थानचा इतिहास —

खोत भिडे यांची एक गाय सतत काहीं दिवस दूध देत नव्हती, म्हणून गुराख्याने बारीक लक्ष ठेवले. त्याला दिसले कि सध्याचे मंदिराचे जागी डोंग-रांच्या एका शिळेवर गाईच्या स्तनातून सतत दुधाचा अभिषेक होत आहे.

हा प्रकार दिसला त्याच रात्री खोतांना श्री गणेशांचा दृष्टांत झाला म्हणून त्यांनी त्या जागेची साफसफाई करून तेथे झोपडी उभारली व त्या शिलेस गणपती मानून शिलेची मनोभावे पुजा सुरू केली. कालांतराने संपूर्ण डोंगर निराकार गणपतीचे रूप मानला जावून तिन फुट उंच व अडीच फूट रुंद शिलाखंडास शेंदूर लावून गंध--फुलांनी देवाची ओंकारयुक्त सोंड काढून पुजा-अभिषेक आदि अर्चना केली गेली.

सहाजिकच पटवर्धन संस्थानिकांचे कुलदैवत असलेल्या या पुळ्याचे गणपती देवस्थानात पुजा, अर्चा व इतर उत्सव करण्या करता पेशवाई व पटवर्धनांचे संस्थानांतून दागदागिने व वर्षासने देण्यात आली आणि या देवस्थानाचे महत्त्व वाढले. छत्रपती शिवाजी महाराजांपासून तो पेशवाई पर्यंत संस्थाने विलीन होईपर्यंत कोणत्या ना कोणत्या स्वरूपात इतिहास देवळाशी निगडीत आहे.

कारण देवालयाचा गाभारा छत्रपती शिवाजी महाराजांचे एक सचिव अण्णाजी दत्तोपंत यांनी बांधला, तर देवालयाचा सभा मंडप सरदार गोविंदपंत बुंदेले (मूळचे आडनाव खेर) यांनी बांधला आहे. देवालयाची फरसबंदी व डोंगरा भोवतालचे एक किलो मीटर लांब प्रदक्षिणेची दगडी वाट (पाखाडी) गोविंदपंत बुंदेले यांनी बांधली आहे. देवळाचे आवारात असलेली पन्नास हात लांब बारा हात रुंद दगडी धर्मशाळा कै. सौ. रमाबाई पेशवे यांनी बांधली होती.

स्वयंभू देवते समोरचा नंदादीप नानासाहेब पेशवे यांचा आहे, तर दुसऱ्या बाजीरावाचा भाऊ चिमाजी अप्पा यांनी देवस्थानाचा नगारखाना बांधला.

हे गणपतीचे देवालय डोंगराच्या पश्चिम बाजूस अगदी पायथ्याशी आहे. मंदिराबाहेर समुद्राचे भरती ओहोटीने ओल्या झालेल्या वाळूचा किनारा पुलिन असल्यामुळे या देवतेस पुळ्याचा गणपती व गावास गणपतीपुळे असे म्हणतात.

हे देवालय गावच्या दक्षिणेस समुद्रतिरी निर्जन प्रदेशी बांधले आहे. देवालयाचे छत कौलारू असून आतील बहुतेक काम लाकडी आहे. देवालया-पुढे धक्का असून त्यास लहान चिरेबंदी कठडा आहे. अशा या रम्य वातावरणांत अथर्वशीर्षाची आवर्तने सतत म्हणण्यात वेगळाच असा वर्णनातीत आनंद भक्तास लाभतो.

दर वर्षी २ ते ८ फेब्रुवारी व २ ते ८ नोव्हेंबर या दिवसात बरोबर सूर्यास्ताचे वेळी भगवान सहस्त्ररश्मी सूर्यनारायणाची किरणे काहीं मिनिटे आतील गाभाऱ्यातील स्वयंभू देवतेवर पडल्यामुळे एक आगळेच विलोभनीय दृश्य निर्माण होते.

धार्मिककृत्य –

श्रींचा चौघडा प्रात:काळी सूर्यास्ताचे वेळी व मध्यरात्रीही वाजत असतो.

(१) चैत्र शु. ॥ १ ते अक्षय तृतीयेपर्यंत रोज सायंकाळी वसंत पुजा होते. त्यामध्ये देवाची महापुजा, आरती, मंत्रपुष्प, प्रसाद व दक्षिणा असा कार्यक्रम असतो.

(२) आश्विन शु. ॥१५ कोजागिरी पासून कार्तिक शु. ॥१५ त्रिपुरी पर्यंत रोज सायंकाळी श्रींची महापुजा, दोन्ही बाजूच्या उंच दगडी दिपमालांवर दिवे लावणे, मंत्रपुष्प, प्रसाद या प्रमाणे दीपोत्सव होतो.

(३) प्रत्येक महिन्याचे शु. ॥५ स दुपारी व संकष्टी चतुर्थीला रात्री श्रींची महापुजा, अभिषेक, मंत्रपुष्प, महानैवेद्य, ब्राम्हण–सुहासिनी भोजन- या कृत्यास गण असे म्हणतात.

(४) वैशाख शु. ॥१५ हा पुष्टिपती गणपती दिवस असल्यामुळे त्या दिवशी व कोजागिरीचे रात्री धनसंक्रांतीत धनुर्मासानिमित्त एक दिवस दुपारी आणि वसंतपूजा व दिपोत्सव यांच्या सांगते निमित्त दोनवेळ अशी वरील कृत्ये प्रतिवर्षी होत असून ही सर्व कृत्ये गावातील लोकांकडून व भक्त मंडळी कडून चालत असतात.

(५) भाद्रपद व माघातील उत्सवाचे तसेच प्रत्येक संकष्टी चतुर्थीस श्रींची पालखी निघते श्रींची चांदीची उत्सवमूर्ती आरती करून पालखीत बसवितात व प्रदक्षिणा करीत समु ाचे काठाने श्रींचे मंदिरात परत आणतात आरती, मंत्रपुष्प होऊन सामुदायिक पद्धतिने भक्तजनांचे कल्याण व्हावे अशी प्रार्थना करतात.

श्री क्षेत्र गणपतीपुळे हे रम्यस्थान, भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या या स्वयंभू मोरयाचे दर्शन होताच नास्तिकालाही आस्तिकतेचा साक्षात्कार घडावा असा हा श्रींचा महिमा आहे. तरी प्रत्येकाने एकदा तरी याचे दर्शन घ्यावे ही भाविकांस नम्र विनंती. ४४ ४४

# साई कृपेने गळा खुलला

***********************

—सौ. मालती केळकर. लेक्चरर
शासकीय कन्या विद्यालय,
महिदपुर (उज्जैन) म. प्र.

० श्री साईबाबा खरोखरीच फार कृपावंत आहेत. ते भक्तांचे कष्ट निवारण करतात. माझा बाबांवर अतूट विश्वास आहे. जून १९८३ चा महिना माझ्याकरिता फार कष्टदायक राहिला. माझा गळा (घसा) एकाएकी बसला व बोलायला फार त्रास होऊ लागला. आपल्या राहत्या गावी महिदपुरच्या डॉक्टरांचा इलाज अगदी दुसऱ्या दिवशीच सुरू केला. जवळ–जवळ आठ दिवस औषध, इंजेक्शने घेतली पण काही फरक नाहीं. त्यानंतर इंदौरचे कान–घसा–नाक स्पेशालिस्ट डॉ. ग्रेहवाल यांना दाखविले. एक्सरे घेतले, रक्त तपासले, पण काही इलाज करून त्यांचा औषधांनी फरक झाला नाहीं. मी व घरची सर्व मंडळी घाबरून गेलो होतो. माझी बाबांवर फार श्रद्धा आहे, मी रोज बाबांचे स्मरण करून गळ्याला उदी लावत होते व कष्ट निवारण करण्यास प्रार्थना करीत होते. मी विद्यालयामध्ये लेक्चरर आहे व माझा शिकविण्याचा विषय हिंदी आहे त्यात फार बोलावे लागते.

जुलाईमध्ये विद्यालय उघडले. मी हजर होऊन पुन्हां सुट्टी घेतली. इलाज चालू होताच बरोबरच मी बाबांचा जप साई ओम् हरी ओम् व साई-राम–साईराम बोलत असे. मग आक्टोबरमध्ये बाबांच्या आज्ञेनेच इन्दौरचे दुसरे कान–नाक–घसा तज्ज्ञ डॉ. मानुधने यांना दाखवले त्यांनी पुन्हां एक्सरे वगैरे काढून इलाज चालू केला. त्यांनी सांगितले की गळ्याच्या उजव्या बाजूची स्वरयंत्र नळी कमजोर झाली आहे, त्यांनी बोलायला अगदीच मना केले, पुष्कळ औषधे दिली, मी त्याबरोबर उदीचाही उपयोग करीत होते. एक महिन्यानीच मला फरक वाटू लागला. नोव्हेंबर मध्ये दिवाळी नंतर माझा गळा पूर्ण बरा होऊन मी पूर्वीसारखे बोलू लागले. हे सर्व बाबांच्या कृपेनेच झाले. एक गोष्ट आणखीन अशी की मी ज्या विद्यालयामध्ये कार्यरत आहे, तिथले प्राचार्य श्री. रशिद मुसलमान असूनही फार चांगले माणूस आहेत. त्यांनी मला जास्त सुट्टीही घेऊ दिली नाहीं. ते मला खूप धीर व सांत्वन देत होते. मला असे वाटायचे की साक्षात् बाबाच मला सबूरी कर असे सांगत आहेत. खरोखरीच बाबांची लीला अपार आहे. ते प्रत्येक संकटातून मला सोडवितात. आता मला गळ्याचा काहीच त्रास नाहीं.

# लेखनसेवा ही शब्दरूप ईश्वराची पूजा होय.

—प्रा. र. श्री. पुजारी.
रमानिवास, ९९२ सदाशिव,
पुणे—३०.

० ईश्वरी कृपेने लाभलेली चार अक्षरे ईश्वरी सेवेकारणी लावणे म्हणजे लेखनसेवा सादर करणे होय. ईश्वराचे नाम लिहिणे, ईश्वरी ग्रंथाची प्रत करणे, ईश्वरी ग्रंथाचा अनुवाद करणे आणि ईश्वरी स्वरूपाचे किंवा सत्तेचे गुणगान त्यानेच दिलेल्या प्रतिभेच्या सहाय्याने लेखनद्वारा करणे ही सर्व लेखनसेवाच होय.

विद्या, धन आणि कला यांचे फारसे पा बळ नसतानाही भजन—पूजन—नामस्मरण ही सेवा कोणाही भक्तास सादर करता येते. लेखनसेवेचे तसे नाहीं. किमान लिहिता वाचता येणे येथे आवश्यक असते. त्याहूनही सद्ग्रंथामधील विचार आत्मसात करणे, स्वानुभवाच्या आधारे चिंतन करणे आणि प्रचितीचे बोल आपल्या शब्दात नीटनेटके मांडणे इतकी तरी विद्या येथे आवश्यक असते.

लेखनसेवा सर्वोत्कृष्ट म्हणून अवघड असते, ती करीत असताना काया, वाचा आणि मन यांचा उपयोग आपण कमी अधिक प्रमाणात करीत असतो. वस्तुत: वाचारूप मनाने लेखणीद्वारा केलेले हे रेखाटन असते. यामुळेच काया, वाचा आणि मन यांचा सुरेख संगम केवळ प्रतिभेने केलेल्या स्वतंत्र लेखनातच आढळतो. याच कारणास्तच ईश्वरी गुणगानपर कथा—काव्य—चरित्र हीच लेखनसेवा ठरते. संत हे ईश्वराच्या बोलत्या चालत्या मूर्ती असल्यामुळे त्यांच्याविषयी केलेले गुणगानपर लेखनही या सेवेत समाविष्ट असते.

ईश्वरी सेवेमधून आपणास लाभलेला आनंद इतरांना आपल्या लेखनामधून पोचावा आणि आपणासही पुन: प्रत्ययाचा आनंद प्राप्त व्हावा अशी भूमिका येथे लेखकाची असते. म्हणूनच असे लेखन मासिक—पुस्तकात प्रकाशनार्थ दिले जाते. ते दर्जेदार असेल तर त्याची आस्वाद्यता अबाधित राहाते. अन्यथा ते दुर्लक्षितही होते.

लेखनसेवा अवघड म्हणण्याचे कारण असे की तिच्यात शब्द, अर्थ, भाव, ताल आणि तोल यांचे चिंतन आणि अनुसरण काटेकोरपणे पाळावे लागते.

शब्द नित्याचेच असले तरी ते पारिजातकाच्या फुलांप्रमाणे अलगद वेचावे लागतात. त्यांचा अर्थ विराट जनमानसात अविच्छिन्नपणे एकच आहे याची खात्री करून घ्यावी लागते. भावात्मक आशय अंतःकरणास भिडणारा असावा लागतो. वाक्यरचनेला ताल असतो. परिच्छेदामुळे सर्वच लेखनाचा तोल सहज-पणेच सांभाळला जातो. थोडक्यात म्हणजे लेखन ही एक श्रेष्ठ कला आहे हे लेखनकाराच्या हळूहळू ध्यानी येते. उपासने विना ही कला साध्य होणारी नाही हेही त्याला मनोमन पटते.

ही उपासना देवाचीही असते आणि लेखणीचीही असते. देवपूजे आधी पूजाद्रव्याची पूजा करावी त्याप्रमाणे लेखणीचे पावित्र्य सेवाभावी वृत्तीने राखावे लागते. थोडक्यात म्हणजे सर्वश्रेष्ठ सेवेचे साधन म्हणजे जी लेखणी ती ईश्व-राच्या चरणी ठेवावी लागते.

बासरी हाती आली म्हणून संगीताच्या ताना तिच्यामधून कोणासही काढता येतील असे नाहीं. शब्द हे माध्यम त्याप्रमाणे आहे. येथे म्हटले तर काहीही नाही, म्हटले तर सर्व काही आहे. शब्दांच्या उपासनेमुळे आणि ईश्वरी कृपेमुळे एखाद्या देवीप्रमाणे यथाकाल प्रसन्न होणारी ही शब्दकळा आहे.

ईश्वराविषयीची प्रेमभावना जेव्हां शुद्ध स्वरूपाची होते, एका प्रेमाविना ईश्वराकडे काहीही मागितले जात नाहीं, तेव्हाच आपल्या शब्दांत प्रेम येते. भावना जेव्हां उत्कट होतात, तेव्हांच शब्द उत्कट होतात. श्री तुकारामांची शब्दरचना म्हणजे खडकावरचा गाडा! श्री नामदेवरायांची शब्दरचना म्हणजे श्रीकृष्णाची मंजुळ मुरली!

जशी भाववृत्ति तशी आणि ती ती भाषा. मग ती कोमल असेल किंवा कठोरही असेल. आर्जवी असेल किंवा हुकूम गाजविणारीही असेल. जे भाषेचे तेच व्यक्तिमत्वाचेही. भिन्न भिन्न व्यक्तिमत्वानुसार त्या त्या लेखनकारांची शैली बनत असते.

भाराभर फुले किंवा पाकळ्या आणून ते सारे समोरील मूर्तीवर रचणे ही पूजा नव्हे. फुलांचे रंग–रूप–आकार ध्यानी घेऊन मूर्तीच्या रंग–रूप–आकाराशी ते जुळतील असे त्यांचे कलात्मक हार करणे ही सेवा होय. ईश्व-राच्या कोमल अंतःकरणाचे वर्णन करीत लक्षावधी शब्दांमधून नेमके अति कोमल शब्द वेचणे; करुणा भाकीत असता आर्तभाव निर्माण करणारे शब्द वेचणे, तर प्रेमकलह करीत असता रोकडे, रोखठोक शब्द श्री तुकारामांप्रमाणे वेचणे ही सर्व प्रतिभेची किमया होय.

जे हाती येईल त्याचे सोने करणे हा प्रतिभेचा गुण होय. शब्द आणि कल्पना यांचे दैवी स्फुरण जेव्हां लेखनकारास होऊ लागते तेव्हां अगदी साध्या विषयासही प्रतिभेचा स्पर्श घडत आहे असे म्हणता येईल.

भक्त ईश्वराच्या जितका जवळ जाईल, त्याच्याशी बोलू लागेल, हितगूज करू लागेल तितके त्याचे अंतरंग शुद्ध होत जाते. अशा शुद्ध अंतरंगामधून पानाफुलांप्रमाणे शब्द डोकावित आहेत असा प्रत्यय त्याला येतो. मोत्याप्रमाणे ते दैवी शब्द वेचून त्यांची माळ बनविणे म्हणजे कथा–काव्य– चरित्र बनविणे होय. लेखनसेवा सादर करणे ते हेच होय.

ईश्वरावरील प्रेमापोटी, राहावत नाहीं म्हणून एखादा भक्त जेव्हां अशी शेकडो पदे, अभंग, कवने लिहून ठेवतो तेव्हां ते सर्व लेखन केवळ स्वतःच्या समाधानासाठी त्याने केलेले असते. प्रसिद्धिची हाव त्यात यत्किंचितही नसते. अशा लेखनातच शब्द, अर्थ आणि भाव त्रिवेणी संगमाप्रमाणे एकवटतात. प्रत्यक्ष ईश्वरच शब्दरूप बनून जातो. पूजा काव्यरूप बनते. शब्दरूप ईश्वराचे हे काव्यरूप पूजन असते. अर्थात् येथे प्रसादही लगेच लाभतो. प्रासादिक रचना ही संज्ञा अशा लेखनासच लागू पडते.

अशी प्रासादिक रचना, सर्वकाळी, सर्व स्थळी आणि सर्व मानवसमूहांना लागू पडणारी असल्यामुळे आधी रामकथेचा जन्म की आधी वाल्मिकींचा जन्म, इतपत संभ्रम निर्माण होऊ शकतो. एक गोष्ट खरी की सादर झालेल्या कोणा एकाच्या लेखनसेवेमुळेच कथा–काव्य–चरित्र यांचा शब्दावतार घडतो.

लेखनसेवा केवळ ईश्वरी कृपेनेच लाभते. ईश्वराचे चिंतन तिच्यात चढत्या वाढत्या क्रमाने घडते. भजन करता करता समाधी लागून आत्मा ब्रम्हानंदी निमग्न व्हावा त्याप्रमाणे स्व–रचित कविता गुणगुणता गुणगुणताही भक्तास भावसमाधी लागते. तिच्यामधून येणारी जाग चैतन्यमयी असते. ईश्वराचे अस्तित्व अवतीभवती भासमान होऊ लागते. भावरूप कवनाला प्रतिभेचा स्पर्श होऊन त्यावर दिव्यत्वाचा साज चढू लागतो. स्फूर्ती, स्फुरण म्हणतात, त्या गोष्टीचा प्रत्यय या लेखनाच्या जन्मास कारण ठरतो.

लेखनसेवा हा ईश्वराच्या मूळ स्वरूपाचा कसोशीने चालविलेला शोध असतो. अजन्म प्रभूच्या जन्मरहस्याचे आणि अ–कर्ता असूनही लोककल्याणार्थ त्याने केलेल्या अवतारकार्याचे हे संशोधन असते. ते संशोधन पुरे होणे म्हणजेच ईश्वराचे सम्यक ज्ञान होऊन जीवनमुक्त होणे होय. म्हणूनच लेखनसेवा हे शीघ्रगती मोक्षसाधन समजण्यात आले आहे. ☆

# टिळा लावला लाल कपाळी साई धावला संकटकाळी।

—सौ. काननबाला अरविंद म्हात्रे.
६१२, श्री व्ह्यू अपार्टमेंट
वरळी, मुंबई ४०० ०२५.
शब्दांकन : श्री. संजय परळकर.

जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरी मी धावेन भक्तांसाठी

० खरोखरच वरील पंक्तीचा अर्थ सार्थ करण्यासाठी श्रीसाई अप्रत्यक्ष माझ्या धाकट्या मुलाच्या पुर्नजन्माचे दान देण्यासाठी धावून आले होते व ते आता मला देवूनही टाकले आहे. आज मला सर्व साईमय दिसू लागले आहे. किंबहुना पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने मी साईच्या जवळ आले आहे. त्याला कारण माझ्या धाकट्या व लाडक्या मुलावर अपघाताने ओढवलेल्या दारुण अवस्थेत स्वत: श्रीसाईरूप घेऊन धावले होते. सदर वस्तुस्थिती अशी की माझा धाकटा मुलगा कु. महेश हा दादर हिंदु कॉलनीतील राजा शिवाजी विद्यालयात इंग्रजी माध्यमात इयत्ता ६ वीत शिकत होता. शाळेने गेल्या फेब्रु. ८४ मध्ये आयोजित केलेल्या (शिर्डी—औरंगाबाद—वेरूळ लेणी) अशा तीन दिवसांच्या सहलीस तो गेला होता. सदर सहल ही साईद्वारातून पुढे जाणार असल्याने मी त्यास निर्धास्तपणे परवानगी दिली होती. परंतु विधिलिखित वेगळेच होते. सहलीची बस शिरडीहून पुढे औरंगाबाद अंजिठा—वेरूळ लेण्यांचे बोधप्रद व नयन मनोहर असे दर्शन विद्यार्थ्यांनी घेतल्यावर परतीच्या प्रवासास निघाली होती. त्या संध्याकाळी नव्हे तर त्या काळसंध्येला त्या बसला समोरून येणाऱ्या एका ट्रकने मागील बाजूस जोरदार ठोकर मारली. त्यातच कु. महेश यास अगदी मागच्या आसनावर खिडकीलगत तो बसल्या कारणाने त्याच्या हातास गंभीर स्वरूपाची दुखापत झाली. बसचा मागील पत्रा फाटला गेल्याने अपघात किती भीषण होता ते सांगावयास नकोच. अशा प्रसंगी आम्ही आई—वडील घरी मुंबईमध्ये व मुलगा काळाच्या जबड्यात बारा कोसावर! वेळ आणी-बाणीची. परंतु नाही! साईंवर असलेल्या माझ्या अपार श्रद्धेमुळेच त्याच्या

जीवावरचा धोका टळला होता. त्याचप्रमाणे सुदैव हे की, त्या सहलीस ज्या शिक्षकांची नेमणूक करण्यात आली होती त्यापैकी दोघे गैरहजर राहिले. म्हणून आयत्यावेळी जो शिक्षकवर्ग नेमला त्यांनीच विशेषत: अपघात स्थळापासून ते रुग्णालयामध्ये (अर्थात आम्ही स्वत: तिकडे पोहोचेपर्यंत) माझ्या मुलासाठी सर्वतोपरीने मदत केली ही निव्वळ साईकृपाच! तसेच महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिकडे रहाणाऱ्या एका अज्ञात महिलेने रात्रभर माझ्या मुलासाठी जागरण करून व होम जप करून एवढेच नव्हे तर शेवटी त्याच्या कपाळी कुंकू लावून उपस्थित शिक्षकवर्गास सांगितले की 'हा मुलगा लवकर बरा होईल' सदर घटना शिक्षकांनीच आम्हांस सांगितली. ज्या महिलेने माझ्या मुलासाठी एवढे प्रयास घेतले तिने तब्बल तेरा दिवसात (आम्ही रुग्णालयात पोहोचल्यानंतर) भेटतर घेतली नाहीच तर साधी चौकशीसुद्धा केली नाहीं. परंतु तिने मुलाच्या कपाळास लावलेला कुंकवाचा टिळा मात्र २।३ दिवस साक्ष देत होता हेच राहून–राहून आम्हांस चमत्कारिक वाटत होते व मन चक्रावत होते. दुसरे म्हणजे रुग्णालयामध्ये तज्ज्ञाने सांगितले की मुलाच्या प्राणावरील धोका टळला आहे. तरीसुद्धा हाताला गंभीर दुखापत झाली आहे. कदाचित त्याचा हात कापणे हा एकच उपाय करावा लागेल. आम्ही आमच्यापरीने शक्य तो प्रयत्न करू. यश येणे आमच्या हातात नाहीं. ते ऐकून मी क्षणभर स्तब्ध झाले. पण नाहीं! पुनश्च मी माझ्या साईमाऊलीचा धावा केला व खरोखरच माझ्या हाकेला दाद मिळाली. हात काही कापला गेला नाही व आता तोच उजवा हात साईकृपेनेच सुधारत असून माझ्या मुलास पुनर्जीवन प्राप्त झालेले आहे. त्याचबरोबर त्या हाताची पुढील दुरुस्ती मी आता साई माऊलीच्या हाती सोपविली आहे. तेव्हां तीच आता त्याच्या हातास पूर्ववत स्थिती प्राप्त करून त्याच दोन्ही हातांनी नमस्कार करण्यास शक्ति प्राप्त करेल. ह्याबद्दल मला तीळमात्र शंका नाही. ह्यापुढे चमत्कारास नमस्कार नसेल तर प्रत्येक नमस्कारास चमत्कार दिसेल अशी माझी आता भावना झाली आहे.

**नित्य मी जीवंत जाणा हेचि सत्य**
**नित्य घ्या प्रचित अनुभवे ।**

# अंतर्मनातील दीपोत्सव

—श्री. वसंत वामन प्रधान.
श्री गणाधिराज को. ऑ. हाऊसिंग
सोसायटी, लि. बि. नं. २, ब्लॉक नं. ९२,
मिठागर रोड, मुलुंड (पूर्व),
मुंबई – ४०० ०८१.

।। लक्ष लक्ष तू दीप लाविले भक्तांचे अंतरी ।।
।। दीपोत्सवाने फकीर दिसला तेजोमय श्रीहरी ।।
।। मशीद, मंदिर सर्व प्रकाशित केले तेजाने ।।
।। देव दाखवी सर्वत्राना हृदयी प्रेमाने ।।

० श्री साईबाबांनी पणत्यात पाणी ओतून त्या प्रज्वलीत केल्या या घटने संबंधी मी माझे गुरु श्री संत दासगणू महाराज यांना विचारले असता ते म्हणाले, होय त्या जळणाऱ्या पणत्या मी पाहिल्या आहेत व त्या अगणित होत्या. श्री बाबांनी प्रत्यक्षात जरी थोड्या पणत्या पेटविल्या असल्या तरी श्री बाबांच्या योग सामर्थ्याने त्या शतगुणीत झाल्या व सारे आसमंत प्रकाशमय झाले होते. पाणी म्हणजे जीवन व ते श्रीसाईबाबांनी प्रज्वलीत केले. श्री साईबाबांनी आपल्या साऱ्या साईभक्तांच्या हृदयात प्रकाश निर्माण केला, चैतन्य दिले. म्हणून संसारात परमार्थाचा मार्ग दिसला. प्रपंच करावा नेटका हा समर्थ रामदासांचा संदेश आपलेकडून ते आचरून घेत आहेत. विश्वकुटुंबाची व्यापक कल्पना साईकुटुंबियांनी साकार केली. जीवन हे प्रवाही आहे पण ते चैतन्यमय होण्यास सद्‌गुरुची कृपा पाहिजे. श्री साईबाबांच्या सहवासात ते देहधारी असताना जे जे आले ते सारे परम भाग्यवंत. श्री बाबा मूर्तीमंत चैतन्य, तेजोमय ब्रम्ह ते ज्यांनी पाहून जाणले ते जणू श्रीराम, श्रीकृष्ण या भगवंताच्या अवतारात त्यांच्या सान्निध्य राहून जसे जीवनमुक्त झाले तसेच श्रीसाईबाबांच्या सहवासात पूर्व संकेतानुसार देव म्हणजे काय हे प्रत्यक्ष अनुभवले. कुणी श्री बाबांमध्ये रामरूप पाहिले कुणी विठ्ठलरूप पाहिले कुणाला सद्‌गुरुंचा साक्षात्कार झाला, तसेच गीता ज्ञानेश्वरी उपनिषदे यांत सामावलेले अवघड तत्त्वज्ञान समजाविले तरीही श्रीबाबा ग्रामीण भाषेतील व

ग्रामीण जनतेतील एक सामान्य माणूस म्हणून एकरूप झाले व सामान्यातील हा असामान्य योगेश्वर कृष्ण परमात्मा बालगोपाला समवेत मायेचे पांघरूण घालून वावरला म्हणून तर या देवाला लोक आपल्या जीवनाचा सखा मानीत आहेत. अखिल मानव समाज जात, धर्म पंथ विरहित त्यांच्या छायेखाली एकवटला. पृथ्वीची वाटचाल विनाशाकडे होत आहे अशावेळी हा गोवर्धन धारी कृष्ण त्याच्या छत्राखाली आम्हांला घेवून निर्भय करीत आहे. असा हा प्रेममय दयाघन गतकालात आपल्या दाराशी भिक्षेची झोळी घेवून उभा असलेला हा कुबेर लोकांच्या अंतर्मनात स्थिर आहे. अनेक लोकांना शेकडो चांदीचे रुपये रोज वाटणारा, दुःखीतांची दुःखे दूर करणारा प्रत्येकाला आपल्या जीवनाचा आधार वाटणारा, शिरडीवासी, आपले नित्याचे व्यवसाय करीत असता मशिदीतील बाबांकडे पाहून त्यांना डोळयात साठवून पुन्हां आपल्या कामधंद्याकडे वळणारे ग्रामस्थ अजूनही येरझाऱ्या घालीत आहेत. कधी एखादा म्हातारा जुन्या आठवणीने डोळयात पाणी आणून जुने अवशेष पहात आहे. मला एकदा संत अब्दुल्ला बाबा म्हणाले होते, श्री बाबांच्या समाधी नंतर गेली कित्येक वर्षे मी बाबांसारखी व्यक्ती दिसावी म्हणून पहात आहे पण ती न दिसल्याने अंतर्मनातील श्री बाबांची मूर्ती पहात आहे, मला गहींवर येतो. मग मी श्री बाबांच्या समाधिवर फुले वाहतो. डोळयातील दोन अश्रू सांडतो, व खालच्या मानेने येवून कुराण वाचतो. आता अबदुल्ला गेले, संत दासगणू गेले अनेक रत्ने श्री चरणावर पडली, सार्थकी लागली. मुक्त झाली. माझ्या अंतर्मनात साऱ्या स्मृती एकवटतात मी समाधिवर डोके टेकतो व घशात हूंदका दाटतो क्षणभर काहीच दिसत नाहीं. चिमूटभर उदी तोंडात टाकतो व जीवनाचा प्रवास श्री चरणाशी विसर्जित व्हावा म्हणून बाबा अशी हांक मारतो ती शब्दरूपाने उमटत नाहीं व माझी अस्तित्व विरहित वाटचाल सुरू होते. ती गतस्मृतींचे धागे उलगडीत त्या अनादी अविनाशी अनंताकडे अनंत कोटी ब्रम्हांड नायक श्रीसमर्थ सद्‌गुरु साईनाथांच्या विश्वव्यापक चरणांकडे.

# मुलीचा ताप गेला

—श्री जयवंत हरी पांढरे
१६ ए, मधुगिरी, व्हीं. एन. पुरव
मार्ग, चेंबूर, मुंबई– ४०० ०७१.

० मी एक साईभक्त असून 'युनिव्हर्सल इंटरफोल्स कंपनी' या कंपनीचा भागीदार आहे. कामानिमित्त मला गोदावरी शुगर मिल्स, लक्ष्मीवाडी, ता. कोपरगाव येथे नियमित जावे लागते. अशावेळी मी प्रथम शिरडी येथे जाऊन बाबांचे दर्शन घेऊन नंतरच पुढील कामे करीत असतो.

असेच १९७५ च्या मे महिन्यात मी सहकुटुंब शिरडीस बाबांचे दर्शन घेऊन नंतर लक्ष्मीवाडीस गेलो. त्यारात्री अचानक माझ्या ६ वर्षाच्या मुलीस ताप भरला. स्थानिक डॉक्टरांकडून औषध आणले पण ताप उतरेना. रात्री १०२ प"त ताप चढायचा, शेवटी मी तेथून मुंबईस जाण्याचा निश्चय केला. तेथील अधिकाऱ्यांनी अशा अवस्थेत मुलीस न नेण्याचा सल्ला दिला. तरीही आम्ही तेथून कंपनीची जीप घेऊन शिरडीस गेलो. बाबांचे दर्शन घेऊन मग एस. टी. स्टँडवर जावे असा विचार करून आम्ही मंदिरात प्रवेश केला, आणि आश्चर्य असे की, बाबांच्या समाधीपर्यंत येताच माझ्या मुलीचा संपूर्ण ताप उतरला. याच क्षणी आम्हांला बाबांच्या वचनाची प्रचिती आली. नंतर आम्ही एस. टी. स्टँडवर गेलो.

मे महिना म्हणजे मुंबई–नाशिकच्या एस. टी. गाड्या भरून जातात म्हणून काहींशा साशंकित मनाने मी बुकिंग ऑफिसच्या खिडकीजवळ गेलो. बुकिंग क्लार्कने सांगितले मुंबई तसेच नाशिकच्या सर्व बसेस भरल्या आहेत फक्त एक जादा गाडी सुटणार आहे आणि त्यातील फक्त चारच सीट शिल्लक आहेत. आम्हीही चारचजण होतो. आम्ही त्या सीट बुक केल्या. नाशिकला आल्यावर पुन्हां मी बुकिंग खिडकीजवळ गेलो. मुंबईच्या तिकिटांविषयी चौकशी केली, तेव्हां मुंबईच्या सर्व गाड्या भरल्या फक्त एक जादागाडी दोन तासांनी सुटणार आहे व तीत फक्त चारच सीट आहेत खर. तर आम्ही बुकिंग १२–३० वाजता बंद करतो आता १२–४० झालेत तरीही तुम्हांला मी तिकिटे देतोय" असे म्हणून त्याने आम्हांला ४ तिकिटे दिली. सबंध प्रवासात मुलीला ताप चढला नाही. मुंबईस आल्यावर एक दिवसाचे डॉक्टरचे औषध आणले. औषधात बाबांचा अंगारा घालून औषध दिले. ती पूर्णपणे बरी झाली. आम्हां सर्वांची बाबांवर पूर्ण श्रद्धा आहे.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे दोन्हीवेळा जादा गाड्या व नेमकी चारच तिकिटे शिल्लक रहावित तसेच एस. टी. कर्मचारी सहसा बुकिंगची वेळ संपल्यावर एक सेकंदही न थांबणारे पण दहा मिनिटे गेल्यावर देखील तिकिटे दिली हे पाहून कर्ता करविता कोण हे सांगणे नलगे.

बाबा तुमची लीला अगाध आहे.

# साईबाबांची द्वारकामाई

++++++++++ ++++++++

—श्री. रमेश डी. चव्हाण.
साईनिकेतन, गुजरलेन, नवापूर,
मु. पो. ता. नवापूर, जि. धुळे ४२५४१८.

० महाराष्ट्राची भूमी ही जशी शूरवीरांची जन्मभूमी आहे तशीच ती साधुसंतांचीसुद्धा लाडकी भूमी आहे. कितीतरी थोर संतांच्या पुण्याईने ही भूमी चिरकाल पावन झालेली आहे. संतश्रेष्ठ तुकाराम म्हणतात —

"पवित्र ते कुळ
पावन तो देश
जेथे हरीचे दास
जन्म घेती ।"

अशा ह्या पावन महाराष्ट्रात त्यातल्या त्यात पवित्र गोदावरीचा काठ संतांनी पुण्यपावन करून ठेवला आहे. अशाच गोदावरी काठावरील 'शिर्डी' या गावाला साईबाबांच्या वास्तव्याने फार महत्त्व प्राप्त झाले आहे. शिर्डीत बाबांचे प्रदीर्घ वास्तव्य होते म्हणून आजही शिर्डीतील अनेक ठिकाणे साईबाबांची स्मृती सतत जागृत करीत असतात.

समाधी मंदीर, लेंडीबाग, चावडी, निंबवृक्ष, गुरुस्थान, खंडोबा मंदीर, द्वारकामाई अशी कितीतरी नावे घेता येतील या स्थळांपैकी बाबा ज्या मशिदीत रहात असत. तिचा उल्लेख ते नेहमी 'द्वारकामाई' या नावाने करीत.

साईबाबा मशिदीला द्वारकामाई का संबोधीत याबाबतीत माझे विचारचक्र फिरू लागले आणि भराभर ग्रंथांची पाने उलगडू लागतो. श्री साईसच्चरित ग्रंथातील बावीसाव्या अध्यायात द्वारकामाई संबंधी उल्लेख आला आहे तो असा

"बाबा मिरीकरांस ते ठायी ।
पुसती प्रश्न पहा नवलाई ।
अहो ती आपुली द्वारकामाई ।
आहे का ठावी तुम्हाते ॥४६॥

बाळासाहेबास हा काही ।
मुळीच उलगडा झाला नाही ।
तव बाबा वदती "आता पाही ।
द्वारकामाई ती हीच "।४७।।

हीच आपुली द्वारकामाता ।
मशिदीच्या या अंकी बैसता ।
लेकुरा देई ती निर्भयता ।
चिंतेची वार्ता नुरेचि ।।४८।।

मोठी कृपाळू ही मशिदमाई ।
भोळ्या भाविकांची ही आई ।
कोणी कसाही पडो अपायी ।
करील ही ठायीच रक्षण ।।४९।।

एकदा हिचे जो अंकी बैसला ।
बेडा तयाचा पार पडला ।
साऊलीत हिचे जो पहुडला ।
तो आरूढला सुखासनी ।।५०।।

हीच द्वारका द्वारावती ।
बाबा मग तयास देती विभूती ।
अभय हस्त शिरी ठेविती ।
जावया निघती मिरीकर ।।५१।।

चिथळीच्या दौऱ्यावर बाळासाहेब मिरीकरांना सर्पदंशापासून कसे रक्षण केले त्याचा कथा भाग आहे.

द्वारकामाई असता तारिती ।
लांबबावा काय मारिती ।
तारित्यापुढे मारित्याची गती ।
ती काय किती समजावी ।।५५।।

अशी द्वारकामाईची महती साईसच्चरित्रात आली आहे. मशिदमाईच्या (द्वारकामाईच्या) अंकी बैसल्यास आपणास निर्भयता लाभते व कुठलीही चिंता उरत नाही. परंतु आपण अनन्यभावे श्रद्धा ठेवली पाहिजे जर श्रद्धाविहीन असल्यास ती कशी बरे सांभाळ करील असा इशाराही त्यांनी दिला आहे.

"आई ती आई बहु मायाळू ।
लेकरालागी अति कनवाळू ।
परी लेकरेच निघता टवाळू ।
कैसा सांभाळू करी ती ॥७२॥

म्हणनच आपली श्रद्धा ठाम असणे जरूरीचे आहे. वरील ओव्यातील प्रत्येक ओवी, प्रत्येक शब्द स्पष्ट आहे, बाबा सांगतात की, ही मशिदमाई हीच आपली द्वारका की जिची दारे सर्वांसाठी मुक्त आहेत म्हणूनच तिला द्वारका म्हणणेच योग्य नाही का?

बाबांच्या मशिदीत सर्व जातीच्या, सर्व धर्मातील लोकांना द्वारे खुली असतात तेव्हां श्री बाबांचे निवासस्थान खऱ्या अर्थाने द्वारका आहे यात बिलकुल शंका नाहीं. स्कंदपुराणात सुद्धा द्वारके संबंधी उल्लेख आहे तो असा –

"चतुर्वर्णामपि वर्गाणां यत्र द्वाराणि सर्वतः ।
अतो द्वारावत्युक्ता विद्वद्भिस्तत्त्ववेदिभिः ॥

याचाच अर्थ असा की, धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरुषार्थासाठी चारही वर्णांना जेथे सर्वत्र द्वारे खुली असतात अशा स्थानाला तत्त्ववेत्ते द्वारावति म्हणजे द्वारका म्हणतात.

श्री साईबाबांच्या द्वारकामाईत भक्त आवर्जून जातो व चिंतामुक्त होतो. द्वारकामाई वैकुंठ असून बाबा तिथे वास करतात अशी भक्तांची धारणा आहे.

अशा ह्या पृथ्वीवरील वैकुंठरूपी शिरडीच्या द्वारकामाईत बाबा ज्या चुलीवर स्वयंपाक करीत ती चूल, निंबार, जाते, पोते, अक्षयधुनी, बाबा बसत ती शिळा शिवाय बाबांची भली मोठी मनोहारी छबी आहे.

श्री साईबाबांनी आपल्या वास्तव्याने द्वारकामाईचा अणूरेणूही आनंदमय बनून गेलेला आहे. द्वारकामाईचे स्थान जागृत असल्याची प्रचिती लोक आजही घेत आहेत. जो पर्यंत साईवर श्रद्धा कायम आहे तोपर्यंत घेत रहातील श्री साईबाबा व द्वारकामाई यांच्या बाबतीत सांगायचं म्हटलं तर असे –

"गगनात तारका
शिरडीत द्वारका
साईनाथा सारखा
देव नाहीं."

# चंचल मुलगा परदेशात स्थिर झाला

—सौ. सीताबाई सखाराम खानोलकर.
बि. नं. १०७, रूम नं. ३७६२,
टिळक नगर, चेंबूर मुंबई ८९.

० मी चेंबूरची रहिवासी. माझ्या आठवणी प्रमाणे साधारण तीन एप्रिल १९७८ साली मी माझ्या सहकुटुंबियांसमवेत शिरडीस जाऊन आले, व त्या वेळेपासून मी साईनाथांच्या भक्तीत रममाण झाले. मला दोन मुलगे व दोन मुली आहेत. मोठी मुलगी विवाहित असून तिला एक कन्यारत्न आहे. तर दुसरी सध्या विवाह उमेदवार आहे. मोठा मुलगा सुव्यवस्थित कारभार सांभाळीत आहे. परंतु छोटा मुलगा धडाडीचा व सर्व कार्यात प्रवीण असूनही चंचल प्रवृत्तीमुळे म्हणा किंवा ग्रहमानांमुळे म्हणा कुठेही स्थीर होत नव्हता. तरी सुद्धा स्वत: परदेशी जाण्यास तो फार उत्सुक होता व त्या दृष्टीने त्याचे प्रयत्नही चालू होते. मी शिरडी संस्थानच्या साईलीला मासिकाची कायम वाचक असून साईलीलेमुळेच माझ्या मनांत साईनाथांबद्दल श्रद्धा दृढ झाली. असेच एके दिवशी साईलीला या मासिका बरोबरच त्याच्या नावे एक पत्र आले व त्या नंतरही दोन-तीन पत्रे आली परंतु सर्व पत्रांतून कंपनीचा उद्देश हाच असे की सर्व साधारण पाच हजारा पर्यंत खर्च येईल. वर नमूद केल्याप्रमाणे हा चंचळ मुलगा परदेशी ठीक राहिला तर बरा, नाहीतर पैसे फुकट जायचे. म्हणून मी श्री साईनाथांना प्रार्थना केली कि माझ्या मुलाचे सर्व काही खर्चा शिवाय व्यवस्थित करा. साईमाऊलीच ती! हाक ऐकल्याशिवाय कशी राहिल? दाभोलकरांनी लिहिलेल्या श्रीसाईसच्चरितातल्या अध्याय १५ च्या ओवी क्रमांक ६६ ते ओवी क्रमांक ६९ पर्यंत दिलेल्या वचनात बाबा म्हणतात . . .

**"तुम्ही कोणी कुठेही असा, भावे मजपुढे पसरिता पसा, मी तुमची या भावा सरिसा, रात्रंदिसा उभाच ।। माझा देह जरी इकडे तुम्ही साता समुद्रापलिकडे तुम्ही काही करा तिकडे जाणीव मज तात्काळ ।। कुठेही जा दुनियेवर मी तो तुम्हां बरोबर, तुम्हां हृदयीच माझे घर, अंतर्यामी तुमचे मी ।।**

त्यांनी दिलेल्या वचनाला ते जागले. थोड्याच दिवसात पुन्हा साईलीलेबरोबरच आलेल्या पत्रामुळे माझ्या मुलाचे सर्व प्रयत्न फळाला आले व मी केलेल्या प्रार्थनेला बाबांनी यश दिले. व बाबांना दिलेल्या वचनाप्रमाणे मी हा अनुभव, लिहिला. माझा मुलगा चार सप्टेंबर ८४ रोजी परदेशात नोकरीसाठी गेला व आता तिथे तो अगदी ठीक आहे. ही सर्व साईनाथांची कृपा. असेच ते सर्व भक्तांच्या प्रार्थनेला धाऊन येवोत. हीच प्रभु चरणी प्रार्थना. ❀

# आत्मोन्नती

****卐*****卐****

श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे.
३९९, गुरुवार पेठ,
सातारा – ४१५ ००२

० मानवी जीवन हे क्षणभंगूर आहे. या क्षणभंगूर जीवनाचे सार्थक करून घ्यावयाचे असेल तर प्रत्येक मानवाने आत्म्याची उन्नती करून घेतली पाहिजे. या करिता भक्ती हाच सर्वांत सरळ–सोपा मार्ग आहे.

आत्मोन्नती करिता सात्विक भक्ती हाच चिरंतन ठेवा आहे. हा भक्तीचा ठेवा कोणीही उध्वस्त करू शकणार नाहीं. जी व्यक्ती परमेश्वरावर शुद्ध–सात्विक अंतःकरणाने निस्सीम भक्ती करीत असते त्या व्यक्तीला कोणापासूनही भिती अथवा धोका पोहचणार नाही. कारण परमेश्वर हा जगाचा मायबाप आहे. या करिता परमेश्वरावर श्रद्धा हवी, विश्वास हवा, भाव हवा.

– **"देव भावाचा भावाचा । नाही कुणाच्या बापाचा ॥"**

या भारत भू–वर असंख्य भक्त आहेत जो तो आपल्या आवडीनुसार त्या त्या देवदेवतेवर प्रेम करतो, भक्ती करतो.

या कलीयुगामध्ये सर्व भारतवासियांना शिरडीचे साईबाबा हे खरोखरच महान संत लाभले.

साईबाबा हे अंदाजे १८३८ मध्ये शिरडीमध्ये प्रगट झाले. त्यांनी इ. स. १८३८ पासून १९१८ पर्यंत ८० वर्षांच्या कालखंडामध्ये या जगाला सन्मार्गाला लावण्याची, हिंदु–मुस्लीम ऐक्याची महान शिकवण दिली.

श्री साईबाबांनी आपले अवतार कार्य संपवून आज ६५ वर्षे होऊन गेलेली आहेत. परंतु आज देखील कित्येक भाविक भक्तांना साईबाबा हे दृष्टांत रूपाने अथवा प्रत्यक्ष व्यक्तीच्या स्वरूपात भेटल्याची प्रचिती येते.

आपण कोणत्याही दैवताची जेव्हा भक्ती – आराधना करीत असतो तेव्हां आपणाकडून काही चूक होऊ नये अथवा त्रुटी राहू नये म्हणून जो तो

प्रयत्न करीत असतो. आपणांस भक्तीच्या माध्यमाद्वारे त्या परम पित्याचे यथार्थ ज्ञान व्हावे त्याचे दर्शन घडावे या उद्देशाने आपण आपल्या राहत्या गावामध्ये – शहरांमध्ये त्या दैवताविषयी जर कोणी जाणकार असतील तर त्यांच्याकडे उत्तम सत्पुरुष या संदर्भात जात असतो.

परंतु आज कित्येक लोक श्री साईबाबांच्या नांवाखाली किती तरी गैर आणि अनैतिक स्वरूपाची कार्ये करीत आहेत. म्हणजे याचा अर्थ असा नव्हे की, सर्वच भक्त असे करीत असतात. पण जे सच्चे–खरे साईभक्त आहेत त्यांच्या डोळ्यांमध्ये अक्षरशः हे भोंदू–ढोंगी सद्गुरु धूळ फेकीत आहेत. या सच्चा–खऱ्या भक्तांना हे महंत अंधारात नेऊ पहात आहेत.

याकरिता प्रत्येक भक्ताने भक्ती करीत असताना ती अंध स्वरूपात राहू नये, ती डोळस स्वरूपात कशी राहिल याकडे पूर्णपणे लक्ष असू द्यावे.

सध्या महाराष्ट्रात श्री साईबाबा हे दैवत सर्वत्र मानले जाते. वहाने, दुकाने, प्रत्येक घरोघरी साईबाबांचे फोटो – प्रतिमा – मूर्ती आपणांस पहाव यास मिळतात.

लहानशा हातगाडे ओढणाऱ्या व्यक्तीपासून ते सिनेमातील नायकापर्यंत सर्वच लोक आज साईबाबांची आराधना–अर्चना करीत आहेत असे दिसून येते.

परंतु ही आराधना–अर्चना सर्व काही स्वार्थाकरिता असते. ती अंतः-करणापासून केलेली पाहवयास मिळत नाही. साईबाबांची भक्ती–विनवणी ही अंतःकरणापासून केली गेली पाहिजे.

जे सच्चे साईभक्त आहेत ते बाबांची निस्सीम भक्ती करीत असतात. हे त्रिकालबाधित सत्य आहे.

शिरडीसारख्या परम मंगल, सौख्यदायी, आनंदमय स्थानी की जेथे साई-बाबांचे चरणकमल ओसाड, नापिक भूमीस लागून पावन झालेल्या ग्रामी ज्या ज्या घटना पाहावयास मिळत नाहीत त्या त्या घटना या महंत मंडळींच्याकडे पहावयास मिळतात.

आज साईबाबांचे कुठे दोन–तीन दृष्टांत झाले की हे महंत लगेच नाचा-वयास लागतात. कित्येक ठिकाणी नवनविन चमत्कारिक घटना ऐकावयास मिळतात, पाहवयास मिळतात याची माहिती खऱ्या भक्तांना नसते.

भक्ती हा मानवी जीवनातील अत्युच्च आणि अमूल्य असा ठेवा आहे. त्याचप्रमाणे परमेश्वर हा समाधानाचा ठेवा आहे. भक्ती ही शिदोरी आहे. तेव्हा भक्तीचा बाजार होता कामा नये. भक्ती ही जगासाठी नसते ती फक्त आपल्या प्रत्येकाच्या देहशुद्धिसाठी असते.

परमेश्वर हा मंदीरात, प्रतिमेत अथवा दगडात नसून तो आपल्या देहरूपी मंदीरात असून हृदयरूपी गाभाऱ्यात त्याचे वास्तव्य असते. तेव्हा देव हा एखाद्या तीर्थाच्या ठिकाणी अथवा फक्त एखाद्या व्यक्तीच्याच ठिकाणी असतो हे चुकीचे आहे.

परमेश्वराची भक्ती करीत असताना प्रथम अहंकार हा विकार पूर्णतः मूळापासून काढून टाकला पाहिजे. संत नामदेवांनी म्हटले आहे.

**"अहंकाराचा वारा न लागो राजसा ।"**

यावरून हेच सांगता येईल आपण करीत असलेल्या शुद्ध–निर्मळ–निस्सीम भक्तीमध्ये अहंकाराचा वारा देखील लागता कामा नये.

भक्तीमार्ग हा अथांग सागर आहे. भक्ती करीत असताना त्यामध्ये शालीनता, निर्मलता, निर्गविता, निर्पेक्षता, निस्वार्थीपणा इ. गुण असणे आवश्यक असते. त्यामध्ये अहंकारपणा – मी पणा असू नये.

प्रत्येक मनुष्याला परमेश्वराची आठवण होते ती केव्हा तर ज्यावेळी त्याला दुःख–संकटे ग्रासून टाकतात. त्याला दुःख संकटरूपी ग्रहण लागते. तेव्हाच त्याला परमेश्वराची आठवण होते.

आपण परमेश्वराकडे मागताना देखील काय मागितले पाहिजे? परमेश्वराकडे मागतांना चिरंतन टिकणारी कधीही न संपणारी भक्तीची शिदोरी मागितली पाहिजे.

प्रत्येकाने परमेश्वर चरणी आपले तन, मन, धन अर्पण केले पाहिजे. आपल्या भावभोळया परंतु निस्सीम भक्तीची माला आणि श्रद्धारूपी उदबत्ती ओवाळल्यानंतर परमेश्वर प्रत्यक्ष भेटल्याशिवाय राहणार नाही.

आज कित्येक भक्त स्वतःला स्वतःच साईभक्त म्हणवून घेतात. तसेच स्वतःला स्वतःच सद्‌गुरु पदवी लावतात. परंतु "सद्‌गुरु" या शब्दाचा अर्थ

तरी ते पूर्णपण जाणतात कां? बरे, साईबाबांचे भक्त म्हणवून घेतात. मग हे महंत साईबाबांची किती तत्वे अंमलात आणतात? त्यापैकी एक तत्त्वही त्यांचेकड पाहवयास मिळत नाही. मग हे साईभक्त कसे? सद्गुरु कसे?

घरांमध्ये चंदनी देव्हारा आणून त्यामध्ये साईबाबांची प्रतिमा बसविली व चार लोकांना आपल्या अपवित्र हाताने, श्री साईबाबांची परमपवित्र संजीवनी अशी उदी वाटली आणि स्वतःला नमस्कार करवून घेतले म्हणजे साईभक्त झाले कां?

काम–क्रोध–मद–मोह–लोभ–मत्सर (द्वेष) हे षडरिपू ज्यांनी आपल्यामधून जाळलेले नाहीत, नष्ट केलेले नाहीत मग हे महंत स्वतःला स्वतःच सद्गुरु – संत कसे म्हणवून घेतात?

मी अमूकवेळा शिरडीला चालत गेलो, मला अमूक एवढे साईबाबांचे दृष्टांत झाले, मी अमूक एवढे साईचरित्राचे सप्ताह द्वारकामाईत बसून केले, मी रोज अमूक एवढ्या पैशांची सुगंधी फुले व सुगंधीत उद्बत्त्या आणण्यास पैसे खर्च करतो. या प्रत्येक ठिकाणी "मी" आलाच. मग हे स्वतःला स्वतःच साईभक्त, सद्गुरू कसे म्हणवून घेतात.

सद्गुरु ओळखण्याच्या काहीं खुणा असतात त्या खालीलप्रमाणे –

(१) ब्रम्हज्ञानाचा नाश करून अज्ञानरूपी अंधःकाराचा जो नाश करतो आणि जीवात्माचे परमात्म्याशी ऐक्य सा तो तोच खरा सद्गुरु होय.

(२) संसाररूपी व्याघ्राने उडी टाकून देवरूपी गाय व भक्तरूपी वासरू ह्यामध्ये ताटातूट केली आहे असे पाहून जो त्यांची सुटका करतो तोच खरा सद्गुरु होय.

(३) मायाजाळात गुरफटलेले, संसार दुःखाने गांजलेले अशा प्राण्यांची जो मुक्तता करतो तोच खरा सद्गु होय.

(४) वासनारूपी नदीच्या महापुरात सापडून बुडत असता जो प्राणी गयावया करतो त्यामुळे दीन झालेल्या जीवास महापूरात उडी टाकून जो तारतो तोच खरा सद्गुरु होय.

(५) शब्दांच्या अर्थाची फोड करून सारभूत अशी आत्मवस्तू दाखवितो तोच अनाथांचे माहेर – मायबाप तोच खरा सद्गुरु होय.

(६) जो कोणी आत्मज्ञानाचा बोध करून अविद्या समूळ नाहीशी करतो व इंद्रियाचा निग्रह करावयास लावतो तोच खरा सद्गुरु होय.

(७) ज्याच्या अंगी सद्विद्येचे अनंत गुण असून जो शिष्य वत्सल आहे तोच खरा सद्गुरु होय.

वरील सात महत्वपूर्ण गोष्टी सद्गुरु ओळखण्याच्या खुणा आहेत. यामध्ये तिळमात्र शंका नाही.

या सात गोष्टींपैकी किती गोष्टी या आधुनिक महंताकडे पाहवयास मिळतात ............ एकही नाही!

आधुनिक ढोंगी सद्गुरुंच्याकडे कोणतेही चांगले गुण पहावयास मिळत नाहीत. सद्गुरु म्हटले की ते निष्कलंक, निष्पाप, हृदयाची शुद्धता असलेले, निष्कपट व शुद्ध चारित्र्याचे असतात परंतु या ढोंगी, पोटभरू सद्गुरुंच्याकडे यामधील एक देखील गुण पाहवयास मिळत नाहीत. मग हे ढोंगी स्वतःला सद्गुरु व्यर्थ का म्हणवून घेतात.

आपण शिरडीला गेल्यानंतर समाधी मंदीरामध्ये अथवा इतस्ततः फिरत असता स्वर्ग सुखाचा भास होतो. प्रचिती येते तिथे सुप्रसन्नतेचा फुलबाग फुलतो. साईबाबांच्या सुहास्य वदन मूर्तीकडे पाहून सर्व भक्त साईमय होऊन जातात. सर्वजण आपले दुःख व्यथा सर्व काही विसरून साईंच्या दर्शनाने तृप्त होऊन, एकरूप होऊन जातात. तल्लीन होऊन जातात.

शिरडीमध्ये किंवा इतरत्रही अनेक सच्चे साईभक्त आहेत परंतु इतर दैवताप्रमाणे साईबाबा कोणाच्याच अंगात, शरीरात संचारत नाहीत परंतु हे ऐकल्यानंतर नवल वाटल्याशिवाय राहत नाही. यामध्ये तिळमात्र शंका नाही.

परंतु कांही ठिकाणी की जेथे हे ढोंगी–भोंदू स्वतःला सद्गुरु पदवी लावून घेणारे महंत आहेत ते स्वतःला वेगवेगळी नांवे धारण करतात की ज्या नांवांमुळे लोकांमध्ये आपली प्रतिष्ठा वाढेल किर्ती वाढेल इ. गोष्टीकडे या लोकांचा कल दिसून येतो.

आधुनिक ढोंगी सद्गुरु हे पैसा–किर्ती–स्वार्थ याकरिता हपापलेले असतात. आपली प्रतिष्ठा वाढावी, आपले वजन लोकांमध्ये रहावे म्हणून गावातील प्रतिष्ठित व्यक्तींशी हे लोक संधान साधत असतात.

—

साईबाबा शिरडीत वास्तव्य करीत होते त्यावेळी त्यांनी असंख्य भक्तजन निर्माण केले परंतु शिष्य या संदर्भात त्यांनी कोणालाही अनुग्रह दिलेला नव्हता. अथवा स्वत:ची पाद्यपूजा करून घेतली नव्हती.

फक्त साकुरीचे परमपूज्य श्री उपासनी महाराज यांच्यावर श्री साईबाबांची पूर्ण कृपा होती.

परंतु आधुनिक ढोंगी सद्‌गुरु स्वत:ला स्वत: मीच "साईबाबा" आहे असे म्हणतात तेव्हा मात्र आश्चर्य वाटते. कारण साईबाबा हे अवतारी सत्पुरुष होते.

आधुनिक ढोंगी सद्‌गुरु, भाव भोळ्या भक्तांना काही माध्यमांचा उपयोग करून त्याद्वारे चमत्कार दाखवितात व त्यांना आपलेसे करून घेतात. त्यांच्या-कडून स्वत:ची पाद्यपूजा करून घेतात. त्या भावभोळ्या भक्तांना शिष्य करून घेतात. बरे शिष्य केले तरी त्याला काही मर्यादा हवी. जणू काही एखाद्या धाग्यांमध्ये हार तयार करण्याकरिता फुले ओवावित त्याप्रमाणे शिष्य करून घेतले जातात. त्यांना अनुग्रह देतात.

आधुनिक ढोंगी सद्‌गुरु हे शिष्य ही पदवी म्हणजे जणू बाहुला-बाहुलीचा खेळच समजतात.

श्रीसाईबाबा स्वत:ची पूजा कोणाकडूनही करून घेत नव्हते. अथवा कोणास करावयास सांगत नव्हते. कपाळाला गंध देखील लावून घेत नव्हते. त्याचप्रमाणे स्वत:चा फोटोदेखील काढू देत नव्हते.

आधुनिक ढोंगी सद्‌गुरु आपले फोटो एखाद्या नायकाप्रमाणे पोजमध्ये काढण्यास स्वत:च सांगतात.

श्रीसाईबाबा रोज पाच घरी भिक्षा मागून ती एकत्र करीत असत. त्या भिक्षेतील काही भाग स्वत: खात बाकी सर्व भिक्षेचा भाग मुक्या प्राण्यांना — भणंग भिकाऱ्यांना देत असत. साईबाबांना लहानपणापासूनच सर्व सिद्धि प्राप्त होत्या. परंतु त्यांचा वापर त्यांनी स्वत:च्या हितार्थ कधीही केलेला नव्हता.

आजचे आधुनिक ढोंगी सद्‌गुरु आपल्या दारापुढे हीन-दीन, दु:खी, अंगा-मध्ये जीर्ण कपडे घातलेला एखादा भिकारी आला आणि त्याने भिक्षेची याचना

केली तर हे महंत त्याला भिक्षा न देता, कुत्र्याप्रमाणे हाडहाड करून त्या व्यक्तीला शिव्या देऊन त्या व्यक्तीच्या कुळाचा जातीचा उद्धार करतात. त्याच्या दीन हृदयावर शब्दांचे घाव घालून त्याला रित्या हाताने माघारी पाठवितात.

त्या बिचाऱ्या भिकारी व्यक्तीच्या प्राक्तनांमध्ये, संचितामध्ये या जन्मी तेच दिवस असतील तर तो तरी काय करणार? परंतु आपणच जर त्या भिकाऱ्याच्या ठिकाणी असतो तर आपली परिस्थिती कशी झाली असती हा विचार प्रत्येकाने करण्यास शिकले पाहिजे.

तेव्हा प्रत्येकाने आत्मोन्नत्ती होण्याकरिता कार्यरत राहिले पाहिजे. आजच्या ढोंगी, भोंदुगिरी करणाऱ्या आधुनिक सद्‌गुरु महंतांच्या नादी लागू नये. त्यांची शिकार बनू नये. सावज बनू नये.

"साई" हे नांव फक्त एका परमात्म्याचेच आहे. ते नाव कोणीही आपल्या नावास जोडू नये. कारण साई ते साईच. इतरांना तो अधिकार प्राप्त नाही.

श्री साईचरणी शतशः प्रणाम!

## श्रीसाईलीला कडे तूर्त कविता नकोत

श्री साईलीलाकडे भक्तांनी आतापर्यंत भरपूर कविता पाठविलेल्या आहेत. दररोज काव्य साहित्याचा अक्षरशः वर्षाव होत आहे. त्यातून बऱ्याचशा कविता निवडून त्या स्वीकारीत करून ठेवल्या आहेत पण त्याच प्रसिद्ध होण्यास विलंब लागणार आहे. सुमारे ५ वर्षे पुरतील इतक्या कविता शिल्लक आहेत. तरी साई भक्तांनी पुढील सुचना मिळेपर्यंत तरी श्री साईलीलाकडे कविता पाठवू नयेत. पाठविल्यास त्यांची नोंद व दखल घेणे केवळ अशक्य आहे.

— का. संपादक.

# साईकृपेचा अनुभव

—सौ. भावना मोहन बिडीकर.
विजयनगर, बेंगळूर–४०.

० गेल्या वर्षी ध्यानी–मनी नसता शिरडीला जाण्याचा योग आला व श्री बाबांची मूर्ति पाहून मन आनंदित झाले. कधी नव्हे ती मनःशांती मिळाली. तेव्हापासून साईबाबांवर माझी नितांत श्रद्धा आहे. बाबा आपल्या भक्तांचे निवारण करण्याकरिता सत्वर धावत येतात आणि एकदा अशाच एका संकटा-बद्दल मी घाबरले होते. मी बाबांना हात जोडून म्हणाले होते की, जर आमची हरवलेली अंगठी परत मिळाली तर मी 'साईलीला' मासिकामध्ये लेख देईन.

चार महिन्यापूर्वी नुकतेच आम्ही बेळगावहून बेंगळूरला बदली होऊन आलो होतो. माझ्या पतीना ऑफिसमध्ये एक पुष्कराज खडा असलेली अर्ध्या तोळ्याची सोन्याची अंगठी आठवण म्हणून दिली होती. नेहमीप्रमाणे हे त्या दिवशी ऑफिसला गेले होते, आणि रात्री नऊच्या सुमारास त्यांचे लक्ष आपल्या बोटाकडे गेले पण बोटात अंगठी नव्हती. खूप शोधाशोध केली पण अंगठी मिळाली नाहीं. आम्ही खूप निराश झालो होतो. पण मला माहित होते की साईबाबा भक्तांचे संकट निवारण करण्याकरता धावत येतात मी बाबांची हात जोडून प्रार्थना केली. इतक्यात माझे लक्ष बाहेर उभी केलेल्या आमच्या मोटार सायकलच्या पेट्रोल टँकवरच्या पॉकेटवर गेले. सहज मी त्यात हात घातले तर काय आश्चर्य अंगठी तेथे सुरक्षित होती. वाटले साईबाबांनी बाहेर कुठेतरी पडलेली अंगठी आपल्या भक्तासाठी पॉकेटमध्ये आणून ठेवली असावी. साईबाबांची कृपा पाहून मन भारावून गेले.

श्री साईबाबांची कृपा सदैव पाठीशी रहावी हीच साईचरणी प्रार्थना.

★ ★ ★

# इद मुबारक आणि राम–राम

–श्री. मोहन शि. सोनवणे. एम्. ए. बी. एड.
अध्यापक नवागाव, ता. नवापूर. जि. धुळे.

० आठ–दहा वर्षापूर्वीची गोष्ट आहे. नांदगावला नव्यानेच बदलून आलो होतो. येऊन दोन–तीन महिने झाले असतील, माझी त्या गावातील लोकांशी थोडीफार ओळख झाली होती.

त्या गावात रामनाथ व रहिम नावाचे दोघे शेजारी राहत होते. धर्माने जरी ते हिंदु–मुसलमान होते तरी त्या दोघांचे चांगलेच प्रेमाचे संबंध होते. दोघंही एकमेकांच्या संकटसम ी, सुख–दुःखात धावून येत असत, आणि सर्वतोपरी सहकार्य करीत असत. कोणत्याही परकीय इसमास त्यांचा धर्म ओळखता येणार नाही अशाप्रकारे ते एकमेकांच्या धर्मात रूळून गेले होते. रामनाथ ईदच्या दिवशी त्यास ईद मुबारक करीत होता तर दसऱ्याच्या दिवशी रहिम त्याच्या छातीला–छाती लावून राम–राम करीत प्रेमाने ओत–प्रोत होत होता. कुणालाही हेवा वाटावा असे ह्या दोघांचे प्रेमसंबंध होते. गावातील लोकांनाही त्यांचा हेवा वाटत असे.

एका दिवसाची गोष्ट. नंदनगर तालुक्याचे गाव होते. तिथं हिंदु–मुसलमानांची मोठी दंगल झाली, ही बातमी तुफान वाऱ्यासारखी सुसाटून सारीकडे आगीसारखी झपाटली, गावोगावी तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. त्यातून नांदगाव कसे सुटणार? गावातही हिंदु–मुसलमानांचे वैमनस्याचे वलून तट्ट फुगून गावाच्या आसमंतात धुमाकूळ घालू लागले व एक बलून नेमका रामनाथ व रहिम यांच्या ओट्यावर येऊन फाडकन फुटला. त्यांच्या दोघांच्या घरासमोर द्विधर्मीयांची गर्दी उसळली होती. त्या गर्दीतून सूर निघत होता ...

"रहिमने रामनाथच्या ओट्यावर गायींची हाडे फेकली." कोणी कोणाचं न ऐकून घेता हिंदु–मुसलमान एकमेकांवर तुटून पडले. चांगलीच हाणामारी झाली त्यात रहिम व रामनाथ चांगलेच जखमी झाले. शेवटी गावातील प्रतिष्ठित नागरिक, सरपंच, पो. पाटील यांनी येऊन वातावरण शांत केले. त्यावेळी रामनाथ व रहिम लाल अंगाऱ्यासारख्या नेत्रांनी एकमेकांना जाळून टाकणाऱ्या

नजरेने पाहत होते. जीवी मारण्याच्या धमक्या देत होते. काही वेळाने वातावरण शांत झाले. पण त्यांच्या मनातील खळबळ कमी झाली नाही.

या दोघांनीही आपल्या तक्रारी तालुक्याच्या गावी जाऊन नोंदविल्या. अशाप्रकारे त्यांचे मित्रत्वाचे संबंध शत्रुत्वात बदलले. त्यांना तारीख लागली. ते नंदनगरला गेले. कोर्टात त्यांना पुढची तारीख देण्यात आली. तारीख देण्याघेण्यातच दोन–तीन वर्षे निघून गेली. सारख्या तारखांवर तारखा लागत होत्या तस–तसा त्यांच्या मनात जखमांचा डोंब उसळत होता. तो काही केल्या कमी होत नव्हता. अशावेळी दोघांच्या मनात यायचं आपण निर्दोष आहोत रहिम म्हणायचा – "मी काही एक गुन्हा केला नसताना रामनाथने एकाएकी माझ्यावर असा हल्ला करायला नको होता. पण सारे त्या परमेश्वराच्या हाती असते. असो." तसेच रामनाथही मनातल्या मनात म्हणायचा – "ह्या रहिमवर मी इतके जीवापाड प्रेम केले तरी देखील तो जातीवरच गेला आणि त्याने माझ्या धर्माला बट्टा लावला, मैत्रीच्या नावाला त्याने कलंक लावला, असे वर्तन करणे त्याला शोभत नाही." अशा प्रकारे त्यांच्या मनातली अढी मात्र कायम होती.

पुढची तारीख त्यांना १८ मार्च देण्यात आली होती. त्यावेळी दोघही आपल्या बैलगाड्या जुपून तालुक्याच्या गावी गेले. त्यावेळीसुद्धा नेहमीप्रमाणेच घडले. त्यांना पुढची तारीख देण्यात आली. दोघांनाही एकमेकांचा खूप–खूप राग येत होता. फक्त काडी लावण्याचे तेवढे बाकी होते कारण ते दोघेही एकमेकांविषयी रॉकेल ओकत होते.

तिसरा प्रहर झाला. दोघांच्याही गाड्या गावाकडे जायला निघाल्या रहिमची गाडी मागे होती. त्याला घराकडे जायची घाई झाली होती. धावपळ करीत रामनाथच्या गाडी मागे रहिमची गाडी येऊन ठेपली. गाडी पुढे काढण्यासाठी रहिमने खूप प्रयत्न केला पण रामनाथ सारखा आडवा येत होता तो आपली गाडी हळू–हळू चालवित होता. त्यामुळे रहिम आतल्या आत धुमसत होता. शेवटी त्याच्याने सहन झाले नाही व तो राग दाबूनच म्हणाला – "अरे! एक तर गाडी जोरात हाण नाहीं तर बाजूला तरी सार कीं, मला उशीर होत आहे."

त्यावर रामनाथ पेटीची काडी शिलगावल्यागत म्हणाला –

"घाट काही तुझ्या बापाने बांधली नाय, उगाच जोर दाखवू नको मला."

अशा प्रकारे वाटेतच दोघांचे भांडण जुंपले त्यांचे कामगडीही बरोबरच होते. रहिमला त्या नोकरांसमोर झालेला अपमान सहन झाला नाही आणि त्याने त्याचक्षणी रामनाथला गाडीतून खेचून बाहेर काढला, दोघांची हाणा-मारी सुरू झाली. दोघं ही त्वेषाने पेटले. त्यांनी गाडीची शिगाडी काढली व भीम-दुर्योधनासारखी एकमेकांवर वार करू लागले. योगायोगाने दोघांचेही वार एकाच वेळेला एकमेकांच्या मस्तकावर बसले व दोघंही बेशुद्ध होऊन धाडकन जमिनीवर कोसळले. ह्या अचानक चाललेल्या हाणा-मारीत भयभीत झालेले कामगडी केव्हांच गाडी घेऊन सुसाट वेगाने थरथरत गावाकडे निघून गेले होते.

त्याच वाटेने साईबाबांच्या दर्शनासाठी निघालेली भाविकांची बस चालली होती. त्या ठिकाणी येताच ड्रायव्हरने गपकन ब्रेकवर पाय ठेवला. प्रवासी एकमेकांवर आदळले. प्रश्नांकित मुद्रेने पाहत ते ड्रायव्हरला विचारू लागले, "क्या हो गया?" ड्रायव्हरने म्हटले "निचे उतरके तो देखो!" सर्व भाविक खाली उतरले त्यातील एकाने पाहिले की दोन मुर्दे पडले आहेत त्याने हिंमतीने त्यांची नस पाहिली नस व श्वास चालू होता. विशेष म्हणजे दोघांच्याही गळ्यात साईबाबांची प्रतिमा होती. त्यांनी विचार केला जवळपास एखादे मोठे शहर व दवाखानाही नसेल म्हणून त्यांनी त्या दोघांना उचलून गाडीत टाकले व त्यांच्या बरोबरच शिर्डीसच घेऊन गेले. ड्रायव्हरने तीन तासाचा रस्ता अवघ्या दोनच तासात पार केला. गाडी बाजूला लावून सारे खाली उतरले. तेवढ्यात त्यांना त्या दोघांची आठवण झाली. दोघांना घेऊन ते दवाखान्यात गेले. तसे ते आता शुद्धिवर आले होते. त्यांच्या डोक्यावर जखमांवर पट्ट्या बांधल्या. औषधोपचार केला. तरीही त्यांचा माथा ठणकतच होता. जवळपासचे दृश्य पाहून ते भारावून गेले. आपण अशा पवित्र-पावन भूमीत आलेलो पाहून दोघांना अत्यानंद झाला. त्यांनी स्नान वगैरे आटोपले व साईच्या दर्शनास गेले. दोघांनी साईची भक्तीभावाने पूजा केली व त्या भाविकांच्या बरोबर ते जेवण करून रात्री झोपले, काय चमत्कार घडला की त्या दोघांच्या स्वप्नात साक्षात् बाबा आले व त्यांनी साक्षात्कार दाखविला व ते प्रेमाने त्यांना म्हणाले, "अरे वेड्यानों! तुम्ही विनाकारण भांडत आहात. तुम्हांला दूर करण्याचे सारे कारस्थान तुमच्या द्वेष्ट्यांनी केले आहे." पुढे ते म्हणाले, "आणि तुम्ही मात्र विनाकारण एकमेकांच्या रक्ताचे तहानले आहात."

स्वप्न संपताच दोघांचे डोळे मध्य झोपेतही खाडकन् उघडले त्या झोपलेल्या अनेकामध्ये रहिम–रामनाथला तर रामनाथ रहिमला शोधू लागला शेवटी दोघांनी एकमेकांना ओळखले व जवळ येऊन परस्परांना घट्ट मिठी मारली.

तिकडे गाड्या घरी पोहचताच कामगडी बातमी सांगतात न सांगतात तोच रडणं–बोंबलणं सुरू होते. पण अशावेळी कुणी–कुणाचं नसतं. त्याच रात्री त्या दोघं द्वेष्टयांना बाबा साक्षात्कार दाखवितात व केलेल्या कृत्यांची जाणीव करून देतात. सकाळी उठतात तेव्हा त्यांना आपल्या कृत्यांची लाज वाटते ते रहिम व रामनाथच्या कुटुंबियांना दिलासा देतात व त्यांना पाहण्यासाठी निघतात. चालत चालत ते तालुक्याच्या गावी जोडणाऱ्या मोठ्या सडकेवर येऊन पोहचतात व विषण्ण मनाने इकडे–तिकडे पाहू लागतात. योगायोगाने ती भाविकांची बस त्यांच्या जवळ येऊन थांबते त्यातून रहिम व रामनाथ हातात–हात घेऊन खाली उतरतात. हे दोघंही द्वेष्टे त्यांना पाहून नमस्कार करतात व आपले केलेले कृत्य त्यांना सांगून हात जोडून म्हणतात, "मित्रानों आम्हां दोघांनाही तुम्ही क्षमा करा, बाबांच्या साक्षात्काराने आमचेही डोळे उघडले आहेत." प्रेमळ व स्नेहल हृदयी रहिम व रामनाथ त्यांना क्षमा करतात व छातीस लावून घेतात. नंतर चौघेही नंदनगरात जाऊन आपसात समज झाली म्हणून केस काढून घेतात. बाबांच्या चमत्काराची ी सारी घडलेली घटना गाभाऱ्यात घमघमलेल्या सुवासासारखी साऱ्या गावात दरवळली.

पुन्हा गावात प्रेमाचे व सलोख्याचे वातावरण निर्माण झाले. सारेच हिंदु ईदच्या दिवशी मुसलमानांना ईद मुबारक करीत होते, तर मुसलमान दसऱ्याच्या दिवशी संपूर्ण हिंदु बांधवाना राम–राम करीत होते. आता त्या गावातील लोकांच्या ओठावर "ईद मुबारक व राम–राम" हे शब्द सस्मित येत होते.

# जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव

—श्री. लक्ष्मण सखाराम खांडपेकर.
'ईषकृपा', शिवाजी नगर,
राबोडी, ठाणे.

० मला बऱ्याच दिवसांपासून क्षयाचा विकार आहे. केव्हां केव्हां हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावे लागते. यावेळी मला बराच अशक्तपणा जाणवू लागला. तेव्हा थोडे दिवस विश्रांति व हवा बदलण्याच्या दृष्टीने मी तळेगाव जनरल हॉस्पिटलमध्ये प्रवेश मिळविला. मी ठाण्याहून — घरून निघतानाच श्री साईसच्चरित हा ग्रंथ बरोबर घेतला होता. त्याचप्रमाणे श्री साईलीला मासिकेही बरोबर घेतली. शनिवार दि. १२–११–८३ रोजी मी तळेगाव जनरल हॉस्पिटलला ॲडमिट झालो. माझी तपासणी होऊन मला १५ दिवसाचे औषध मिळाले. गुरुवार दि. १७–११–८३ रोजी मी श्रीसाईचरित्र सप्ताह करण्याचे ठरविले. परंतु मी एक आजारी पेशंट म्हणून हॉस्पिटलमध्ये दाखल झालेला. या ठिकाणी माझा हा बेत सिद्धिस कसा जाणार हा प्रश्न मला भेडसावित होता. मी माझ्या साईदेवाला प्रार्थना केली. "साईनाथा कोणतीही अडचण न येता माझी इच्छा पूर्णत्वास ने." अशी मनःपूर्वक प्रार्थना करून सप्ताहास सुरूवात केली. दिनांक २३–११–८३ पर्यंत माझे ५२ अध्याय पूर्ण झाले व ५३ व्या निरूपणाचा अध्याय गुरुवारी दि. २४–११–८३ रोजी स्नान–संध्या आटोपून वाचनास सुरूवात करणार तोच भल्या पहाटेस माझा मुलगा चि. मोतिराम व आमच्या कंपनीतील काही स्टाफ मेंबर्स अचानक तेथे उपस्थित झाले. त्यांना अनपेक्षित समोर पाहताच मला अत्यंत आनंद झाला. सप्ताह समारोपाला घरची आणि परिचयाची मंडळी बाबांच्या आरती सोहळ्यास उपस्थित; ही सर्व बाबांचीच कृपा. नाहीतर हे निरूपण मला एकट्यालाच एकांगीपणाने उरकावे लागले असते. परंतु आम्ही सर्वांनी मिळून मोठ्या आनंदाने निरूपण–आरती आटोपली. प्रसाद घेऊन आलेली सर्व मंडळी दुपारच्या गाडीने मुंबईस परतली. पुढे मला तेथे उपचार बरोबर न मिळाल्या कारणाने मी स्वतःच डिस्चार्ज घेऊन दि. ८–१२–८३ गुरुवारी तळेगावहून निघालो. दुपारी १२–५ च्या गाडीने शिवाजीनगर येथे गेलो. व तेथून अहमदनगर मार्गे श्री क्षेत्र शिरडी येथे ७–३० वाजता पोहोचलो. मला प्रवासात काहीही त्रास झाला नाही. परंतु गाडीतून उतरून मंदिराकडे निघालो तो मला

फारच दम लागला. मला चालवेना. कारण २५ दिवस हॉस्पिटलमध्ये होतो. चालण्याची सवय राहिली नव्हती. मनात अनेक बरे वाईट विचार आले. इकडे आपणास अधिक त्रास झाला तर आपण असे परक्या आणि अनोळखी ठिकाणी. सोबत कोणीही नाहीं. कसे होणार? थोडावेळ विश्रांतीसाठी थांबून साईबाबांचे चिंतन करून व सर्व भार बाबांवर टाकून उठून पुढे निघालो. गुरुस्थानात गेलो. मनसोक्त दर्शन घेऊन थोडावेळ थांबून परत बॅग उचलून निघालो. प्रवेशदारातून निघालो. मनात एकांगीपणाने व आपल्या क्षीण प्रकृतीचे विचार, घरापासून दूर, कुणाची देख ना ओळख कसे होणार आपले? हेच विचार राहून राहून मनात घोळत होते तोच मला नावाने कोणीतरी हाक मारल्याचा मागून आवाज आला. "खांडपेकर, अहो खांडपेकर!" आवाज काहींसा अनोळखीच. मी मागे वळून पाहिले. तो माझे एक मित्र श्री. हरमळकर हे गोव्यास राहणारे. सोबती—सखा सोबती मिळाला म्हणून अत्यानंद झाला. तोंडातून सहज "बाबा सद्गुरु साईनाथ." असे शब्द बाहेर पडले. तोच श्री. हरमळकर जवळ येऊन ठेपले. बऱ्याच वर्षांनी आमची भेट झाली. आम्ही एकमेकांना कडकडून भेटलो. आणि माझी सर्व चिंता कोठल्या कोठे नाहीशी झाली. बाबांनी माझी चिंताच दूर केली. बाबा त्रिकालज्ञानी अशी आपल्या भक्तांची काळजी घेतात. माता आपल्या बालकाची काळजी घेते तशी बाबाही आपल्या भक्तांची काळजी घेतात, आणि भक्ताचे मनोरथ पूर्ण करतात. पुढे बाबांची पालखी, शेजआरती आटोपल्या नंतर मी निश्चित मनाने झोपलो. पहाटेच उठून प्रातिविधि—स्नान आटोपून काकड आरती नंतर श्रीबाबांचे स्नान झाल्यावर माझे मित्र श्री. हरमळकर यांना माझे परतीचे – ठाण्याचे एस्. टी. चे तिकीट रिझर्व कराचयास सांगितले. तुम्ही येईपर्यंत मी द्वारकामाईत बसतो. मी प्रत्येक वेळी एकच मुक्काम करीत असे. पण या वेळी जेव्हांचे तिकीट मिळेल तोपर्यंत थांबायचे असे ठरविले. परंतु नेहमी माझा मुक्काम एक दिवसाचाच. त्याला अपवाद कसे ठरावे. तिकीट दुपारचे २—०० च्या गाडीचे मिळाले. महाप्रसाद, घेऊन आम्ही निघालो. गाडीतही भोपाळहून ठाण्यास जाणारे भाविकांचीच संगत मिळाली. त्यांच्या संगतीत आणि बाबांच्या विषयीच्या चर्चेत ठाण्यास केव्हा पोहोचलो ते समजलेच नाहीं.

अशी आहे बाबांची किमया – सर्वांशी सुख लाभावे! तशी आरोग्य संपदा। कल्याण व्हावे सकलांचे । कोणी दुःखी असू नये ॥

ओम् श्री सद्गुरु साईनाथ महाराज की जय!

साई चरणी शतशः प्रणाम

# दिघेकाकांना बाबांचे दर्शन

—श्री. वि. स. महाबळेश्वरकर.
रामदास निवास, ब्राम्हण सोसायटी,
नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

० साईभक्त श्री. रामकृष्ण देशपांडे हे पार्डीच्या पं. सातवळेकर यांचेकडे काम करीत असत. आपले नशीब काढावे म्हणून मुंबईस येत असतांना वाटेत शिरडीस जाऊन पू. श्री. साईबाबांचे दर्शन घेऊन ते बसतात तोच श्री साईबाबा त्यांना म्हणाले, "अरे, पळ, मुंबईला तुझी भाकरी तुझ्यासाठी खोळंबली आहे." श्रींची आज्ञा होताच रामकृष्ण मुंबईस आले. मित्राकडे येताच त्यांना चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. रामकृष्णाने आपले बहिणीस हे वर्तमान कोकणात सांगितले असता तेथे त्यांचा भाचा श्रीधर वडिलांना म्हणाला, "बाबा, हे साईबाबा कोण? वडील श्री जनार्दनपंत म्हणाले, "बाळा, श्रीसाई हे संत आहेत. परमेश्वराचे अवतार आहेत. इच्छा केली की भक्तास दर्शनासाठी बोलावून नेतात."

चि. श्रीधराने पत्र लिहिले व श्री साईबाबांची प्रार्थना केली, "बाबा मला आपले दर्शन हवे. ते पत्र एका औदुंबर वृक्षाखाली पुरले व तेथे देव असतो हे मानून सात दिवस प्रदक्षिणा घातल्या.

सातवे दिवशी श्रीधराचे आईस स्वप्नात जाऊन श्रीसाईबाबा म्हणाले, "आई तुझ्या मुलाला माझे दर्शनास यावयाचे आहे. त्याला अडथळा करू नकोस."

स्वप्न सकाळी घरात सौ. आईने सांगितले. त्या दिवशी शिरडीहून श्रीधराचे नावे पत्र व पाच रुपये आले, म्हणून दुसरे दिवशी त्याला बोटीने मुंबईस मामाकडे रवाना केले गेले.

मुंबईस बंदरावर उतरताच कोणी अज्ञात गृहस्थाने श्रीधरास फणसवाडीत त्याच्या मामाकडे पोहोचविले.

मामाने सायंकाळी श्रीधरास माहिती देऊन दिल्ली एक्सप्रेसमध्ये बसवले व मनमाड स्टेशनवर उतरून गाडी बदलण्यास सांगितले. गाडी निघाल्यावर थंड वाऱ्यामुळे श्रीधरास झोप लागली. तो अचानक जागा झाला तो इगतपुरी स्टेशनवरून गाडी पुढे चाललेली. भांबावल्यामुळे श्रीधरास रडू कोसळले तोच समोर बसलेल्या एका शेटयाने त्याला कुरवाळले व म्हणाला "बाळ कुठं जायचंय तुला?"

श्रीधर :— मला शिरडीला जायचंय. मनमाड स्टेशन गेले का?

शेटिया :— उगी बाळ, मी शिरडीलाच जातोय. तुला मी नेईन. झोप थोडा. मनमाड स्टेशनवर अल्पोपहार करून शेटियाने श्रीधरास बाहेर नेले व नव्या फियाट गाडीने शिरडीस नेऊन सगुण यांचे खानावळी समोर आणले. नंतर श्रीधरास द्वारकामाई मशिद दाखवली व गाडीतून खाली उतरविले तात्काळ मोटर व शेटिया अदृश्य झाले.

द्वारकामाईचे पुढील अंगणात श्रीधर दिसताच भक्तकल्पद्रुम श्रीसाईबाबा धावत गेले व त्याला पोटाशी धरले व म्हणाले "बेटा, तेरेकू लाये के नहीं?" श्रीधरास बरोबर नेऊन श्रींनी आपले जवळ बसवले व आपले हाताने त्याचे तोंडात प्रसाद घातला.

तीन दिवस ठेऊन घेऊन नंतर श्रीसाईंनी श्रीधरास तेथून वीरकर नावाच्या ब्राम्हणाकरवी चावडीवर जेवण दिले. तेथेच एक युवती आली व म्हणाली "श्री बाबांची आज्ञा झाली आहे, तुला मी मुंबईस पोहोचविणार आहे."

श्रीधर हात धुवून श्री वीरकर यांना सांगणेसाठी आत गेला तर तेथील माणसाने सांगितले, "अरे, वीरकर नावाचा कुणीही या शिरडीमध्ये नाहीं. असो.

श्रीधर त्या युवतीबरोबर दुसरे व तिून मुंबईस आला. आल्यावर तिने टांगा केला. मामाचे घरा समोर तो येताच श्रीधर पटकन खाली उतरला व मागे पहातो तो काय? ना व्हिक्टोरिया ना ती युवती!! श्रीधराचे मामा यावेळी बाहेरच उभे होते.

धन्य ते साईनाथ जे—अनेक रूपे फुलवी भक्ती । भक्तालागी देती प्रचिती॥

पूर्वसंचित पुण्यसंचय ईश्वरदरबारी ठेवून आनंदाने देह विसर्जित करून दिघे कुटुंबात जन्म घेणारे हेच ते ठाण्याचे श्रीधर जनार्दन दिघे. त्यांची योग्यता किती मोठी असेल? ∞ ∞

# साई शक्ती महान देई भक्तांशी जिवदान

—श्री. राजेश गणपत खुस्तळे.
साळीवाडा, मु. पो. ता. पैठण,
जि. औरंगाबाद ४३११०७.

० २४ ऑक्टोबर १९८३ ची रात्र. ११ चा सुमार. असेल झोपण्याची सर्वांची तयारी चालली आणि अचानक शेजाऱ्यांकडे फोन आला की 'संजयला अपघात झालाय, ताबडतोब निघून येणे'. अपघात म्हटल्यानंतर आमच्या सर्वांच्या मनात अनेक विकल्प निर्माण झाले, अनेक कुविचार मनात घिरट्या घालू लागले. रात्री औरंगाबादला जाण्यास गाडी नसल्यामुळे आम्ही खाजगी गाडीचा शोध सुरू केला. तब्बल दीड तासानंतर आम्हांस एक जीप मिळाली व आम्ही जीपने जाण्याची तयारी केली तोपर्यंत आमच्या मातोश्री अत्यंत घाबरून गेल्या व त्यांनी आपले गुरु श्रीसाईंचा धावा सुरू केला. फोटोसमोर उभे राहून साईस विनंती केली की "हे साई देवा आपण आजवर अनेक भक्तांची संकटे दूर केलीत तरी आपण माझ्या मुलावरचे एवढे संकट दूर करा व त्यास कोठेही मार लागलेला नसू दे."

नंतर आम्ही स जण औरंगाबादेत पोहोचलो. तेथे गेल्यावर आमची गाडी पाहून दवाखान्यातील पहारेकऱ्याने ताबडतोब मेन गेट उघडले व आम्ही आत गेलो. तोपर्यंत आमचे मेव्हणे श्री. नरेंद्र मारवाडे यांनी आमच्या भावास म्हणजे संजय यास घाटी दवाखान्यात अॅडमिट केले होते. ज्या वेळेस आमच्या मातोश्रीने संजय यास पाहिले तेव्हां आम्हां सर्वांना अत्यंत समाधान वाटले. कारण त्यास कोठेही जखम झाली नव्हती फक्त मुका मार लागल्यामुळे त्यास सलाईन वर ठेवले होते. अशा तऱ्हेने आमच्या साईमाऊलीने आमच्यावर आलेले संकट क्षणात दूर केले.

दुसरे दिवशी मातोश्रींची अशी इच्छा होती की, त्याच्या कॉटजवळ साईंचा फोटो असावा आणि काय आश्चर्य त्यास दुसऱ्या रूममध्ये हलविण्यात आले, आणि नेमका त्याच्या गादीजवळ श्रीसाईंचा मोठा फोटो होता. हे पाहून आम्हांस अत्यंत आश्चर्य वाटले आणि साईची किमया किती अगाध आहे याची कल्पना आली. त्यानंतर एक व्यक्ति संजयजवळ सारख्या चकरा मारू

लागली अशा तऱ्हेने त्यास डिसचार्ज दिल्यानंतर त्या व्यक्तीने लिफ्ट बंद असल्यामुळे तिसऱ्या मजल्यावरुन खालच्या मजल्यापर्यंत उचलून आणून रिक्षात बसविले. त्यास आम्ही पैसे द्यावयास लागलो तर त्याने घेण्यास नकार दिला. आम्हांस ती व्यक्ती जणू काय साईबाबाच त्याच्या रूपाने धावून आले असे वाटले. त्याक्षणी आम्ही साईबाबांचे अत्यंत उपकार मानले व त्यास घरी आणले अशा प्रकारे श्रीसाईबाबांनी संजय यास जीवदान दिले.

◆ ◆ ◆

# पिठलं-भाकरी साईबाबाचा प्रसाद

-श्री. सुरेंद्र गजानन चिटणीस.
२५२ ओझर टाऊनशिप.
जि. नाशिक – ४२२ २०७.

० मला स्वतःला पिठलं भाकरी बिलकूल आवडत नसे. परंतु माझे वडिलांना ती फार आवडे म्हणून ज्या दिवशी आमचे घरात पिठलं भाकरी केली जाई त्या दिवशी माझी आई माझेसाठी भाजी चपाती करीत असे. पुढे माझे लग्न झालेवर मी पत्नीसह नोकरीचे गावी आलो. पहिल्या गुरुवारी माझे ताटात पत्नीने पिठलं भाकरी वाढली मी जरा नाराज होऊन पत्नीला सांगितले की मला पिठलं भाकरी आवडत नाहीं. त्यावर पत्नीने उत्तर दिले की आज गुरुवार आहे. श्री साईबाबांचा वार आहे. पिठलं भाकरी साईबाबांना फार आवडते. तुम्ही खाऊन पहा तुम्हांलाही आवडेल, आणि मी पिठलं भाकरी खावू लागलो. मला खूप आवडली. तेव्हांपासून दर गुरुवारी आमचेकडे पिठलं भाकरी होऊ लागली, व मी आवडीने खावू लागलो. आणि तेव्हांपासून मी साईभक्ती करू लागलो. आमचे घरात सर्वजण श्री साईभक्त आहेत. पत्नी तर साईभक्त आहेच पण मुलं सुद्धा रोज स्नान केल्यावर साईबाबांचे फोटोसमोर उदबत्ती उदी लावून नमस्कार करतात व मगच पुढील दिनचर्येला सुरवात करतात.

★

# साईबाबांनी कुणाला कोणत्या रुपात दर्शन दिले

—श्री. माधव गजानन गोरे
विनायक बाग,
बालाजी मंदिर मार्ग,
कुर्ला, मुंबई ७०.

(१) नाशिकच्या मुळे शास्त्रींना घोलपस्वामींच्या रूपात दर्शन दिले.

(२) बाळा नेवासकरला भुजंगाच्या रूपात गोठ्यात दर्शन दिले.

(३) देव मामलेदारांना संन्याश्याच्या रूपात डहाणूला दर्शन दिले.

(४) गोसावी रामगीर बुवांला जळगाव स्टेशनवर टांगेवाल्याच्या रूपात दर्शन दिले.

(५) बाळासाहेब मानकरांना कुणब्याच्या रूपात पुणे स्टेशनवर दर्शन दिले.

(६) मद्रासी भजनी मेळ्यांतील एका बाईला बाबांनी रामाच्या रूपात दर्शन दिले.

(७) मद्रासी भजनी मेळ्यातील एका पुरुषाला बाबांनी समर्थ रामदासस्वामींच्या रूपांत दर्शन दिले.

(८) संत दासगणूना शिरडीत बाबांनी विठ्ठलरूपात दर्शन दिले.

# श्री सद्गुरु कृपाच

—श्री. स. व्यं. कुलकर्णी, एम्. ए.
रि. डे. कलेक्टर, ११८२।१३७३,
ई वार्ड, टाकाळा माळी कॉलनी,
कोल्हापूर.

० श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ हे भक्त काम कल्पद्रुम आहेत. भक्तांचे सर्व ऐहिक मनोरथ पूर्ण करतातच पण शेवटी त्याला आपले चरणी चिरशांती देतात. याब ल माझे पत्नीचे बाबतीत घडलेली हकीगत खाली देत आहे. ती नुकतीच दिवंगत झाली.

माझी पत्नी सौ. सुशीला पुष्कळ वर्षे श्री बाबांची भक्त. गुरुवारचा उपवास व रोजची पूजा. पण सर्व धोपटमार्गी, विधिविधान, ध्यान धारणा वगैरे प्रकार तिला रूचत नसत. श्री दासगणूंची श्री सुमनांजलि जमेल तेव्हां वाचे. फक्त एक दृढ भाव श्री साईबाबांचे चरणी.

ती गेली दोन वर्षे आजारी. तशी अंथरुणावरच. तरी औषधोपचारा वर बरी होती. सोमवार दिनांक ९–१–१९८४ सकाळी तिने स्वप्न सांगितले की आज पहाटे श्री बाबा उशाशी येऊन बसले व म्हणाले बाळ तू काळजी करू नकोस. तुला बरे करतो. त्यानंतर तिची प्रकृति बिघडली. मुलगा नेहमी प्रमाणे नमस्कार करून बँकेस निघाला तर 'मला आज अंधुक दिसते बरे वाटत नाहीं. जाऊ नकोस.' म्हणाली. डॉक्टरांनी तपासले झोपेच्या गोळीचा परिणाम असेल म्हणाले मंगळवारी सर्व डॉक्टर जमले व 'लास्ट स्टेज' असल्याचा निर्णय दिला. त्यानंतर नेहमीची धावाधाव वगैरे घरची सर्व मंडळी आली. नातेवाईक सर्व भेटून गेले. डॉक्टरनां व नातेवाईकांना मंगळवार पासून शेवटपर्यंत तिचे एकच उत्तर की माझे चांगले आहे. बरे वाटते. रडायचे नाहीं. कोणास काहीं सांगणे नाहीं. शुक्रवार, शनिवारी मुले कोणी जवळ बसली अंगावर हात ठेवला तर, हात खाली काढून ठेवी व पलिकडे खुर्चीवर बसणेस सांगे. रविवारचा दिवस मकर संक्रमण निघाले. सकाळची पूजा झाली. सौभाग्य वायन दान–दक्षिणा वगैरे तिने आपल्या हाताने दिले. श्री बाबांचे तीर्थ (दूध) घेतले.

नैवेद्य झाले. डॉक्टर येऊन इंजेक्शन देऊन गेले. त्यावेळी १२॥–१ चा सुमार होता. डॉक्टरनी ग्लुकोजचे पाणी घाला म्हणून सांगितले. लहान मुलांची जेवणे झाली. मोठयांना खाऊन घ्या म्हणून सांगितले. गंगाजलातून ग्लुकोज घातली. ती तोंडातून बाहेर आल्यासारखे झाले म्हणून मुलांना बोलावले तो सर्वजण बाहेर आले. मुलांनी तोंड पुसले. तेवढ्यात ती कुशीवर होती ती सरळ उताणी झाली व तिच्यावर श्री साईंची भव्य छबी आहे तिकडे पहात डोळे स्थिर झाले. तथापि अंग गरम लागत होते. पण डॉक्टरनी कारभार आटोपला असल्याचे सांगितले. प्राण कुडी सोडून केव्हां गेला ते समजले नाहीं. उचकी, खोकला घरघर वगैरे काही नाही.

सुवासिनींनी संक्रांतीची ओटी भरलेली व तिळगूळ पदरात बांधून बाबांचे बोट धरून देवाघरी निघून गेली.

तिला श्री बाबांनी मरणसुद्धा इतके देखणे व मनमानी दिले की पाहणाऱ्या-पैकी प्रत्येकजण हेच म्हणेल आपणास असे मरण मिळावे.

※ ☆ ※

## तवपदीचा जोडा

तू होतास मानव देहधारी मी होते कारे शिरडी नगरी ॥१॥
मी असेन कारे छोटी चिमणी चिवचिव करत गात तव अंगणी ॥२॥
की होते छोटी बालिका खुडूनी तव हाती देत होते कलिका ॥३॥
की असेन रे मी तव चरणीची माती म्हणूनी जडली या जन्मी तुजवरी प्रिती ॥४
तव हातीचे धुनीतले असेन लाकूड तरीच मज लागले तुझेच वेड ॥५॥
की होतें तव करकमलांतील चिलीम म्हणूनी करितोस मजवरी तू प्रेम ॥६॥
असेन खास तव पदीचा जोडा तुजसाठी साई सुमनचा जीव झाला रे वेडा॥७॥

—डॉ. सुमन खानविलकर.
सीताकुंज, लोणावळा.

# मनोभावे करावी तव सेवा

कवित्व नसे हा स्थायीभाव
पद्यरचना नाही माझा स्वभाव ।।

स्फुरले विचार तव दर्शनाने
काया मोहरली तव भजनाने ।।

संतोषलो मी आनंदलो मी
म्हणून हाती घेतली लेखणी मी ।।

किल्मिषे जावो जळमट विचारांची
अभ्रपटले विरून जावो संभ्रमाची ।।

लीन होऊनी पत्करली शरणांगती
सच्चिदानंद अनुभवावा तव संगती ।।

अहंकार मनी वाटेतील धोंड
गर्व मनी दाखवू कसे मी तोंड ।।

मनी भक्ती ती वृद्धिंगत व्हावी
याच द्वारे ईश्वर ओळख व्हावी ।।

लीन तल्लीन मनोमनी मी
कसे ईश्वर समीप जाऊ मी ।।

चिंतनात मी बुडून जावो
भक्तिरसात मी वाहुन जावो ।।

झोकोनी द्यावे मम देहाला
फेकूनी द्यावे मम मनाला ।।

विरूनी जावे विसरून जावे -
विलीन व्हावे समर्पणे करावे ।।

प्रेम, दया, क्षमा शांती
सतत वसु दे मम कांती ।।

मनोभावे करावी तव सेवा
रुग्णें सेवा हाच मम ठेवा ।।

—डॉ. शरद मो. हर्डीकर.
हर्डीकर हॉस्पिटल, गणेशखिंड पथ,
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.

# श्रीसाई स्तवनांजली

श्री गणेशा स्फूर्ती तुजपासून कवनास या प्राप्त होवो ।
सरस्वती देवते शब्दांतून तू ह्या आशिर्वाद देवो ।।

दगडास देव बनवी अशी जयाची लीला ।
गुरुदेव बाबांजींच्या वंदितो मी चरणाला ।।

रुद्र, दत्त, राम, कृष्ण, अनेक नामयांनी जो नटला ।
साईनाथ तो वंदू कायावाचामने, सोडूनी जीवत्वाला ।।

ईश्वराचे सामर्थ्य, शक्ति, तेज, सिद्धवाणी प्रात्य ।
नाहीं त्या साईशरणांगतास कधीही यमबंदीवास ।।

थरारती पंचभूते, आधीन ती तयाच्याच द्वारी ।
मरणें, जरा, व्याधी, दुःख रहातील का शेजारी?

हास्य ज्याचे प्रेमळ, शांत, कृपासिंधू अमृताची धार ।
राखी तो भक्तांची लाज, धावून येई आपत्काळी सत्वर ।।

जयजयकार तयाचा करण्यास, शब्द मात्र अपूर्ण ।
कींबहुना शब्दातीत शब्द "साईनाथ" श्रद्धा भक्तीनेच पूर्ण ।।

जया पाठी उभी ही "अनंतरूप" सत्चिद्धन ईश साईमूर्ती
यशाची त्यांची दुंदुभी दुमदुमे, धर्म, अर्थ, काम मोक्ष क्षेत्री ।।

गुरुचरणांकित
—डॉ. कांबळे
जाधव मार्केट, बदलापूर स्टेशन समोर,
जि. ठाणे ४२१ ५०३.

☆

# हाच मंत्र नेक

घेई घेई वाचे साई नाम एक
दुःखाविण जगण्या हाच मंत्र नेक ।।

सगे संगती सारे सोडतील साथ
आठवा आठवा श्री साईनाथ ।।

दावी योग्य मार्ग साऱ्या भक्ता साई
संकटाचे समई धावे आमुची आई ।।

धन संपत्ती सारे मानवी वैभव
संग न ये काहीं सांगे साईनाथ ।।

मान मरातब आहे सारे झूट
सांगे साईबाबा यातूनी तू सूट ।।

इंदू म्हणे धन्य मी, पुण्य फळा आले
कलीयुगी जन्मा येऊनी साईनाथ भेटले

—डॉ. कु. इंदू नाईक.
सीताकुंज, लोणावळा.

# कृतार्थ जीवनाचे सूत्र

श्रीसाईसच्चरिताचे करीता पारायण ।
मन तल्लीन लागले श्रीसाईचे ध्यान ॥१॥

मन प्रफुल्लित मम अंग रोमांचित ।
श्री साईबाबा साक्षात् समोर दिसत ॥२॥

श्रीसाई सांगती धर श्रद्धा सबुरी ।
देवाला आळवूनि ठेव तव हृदयांतरी ॥३॥

कृपा-कटाक्षे वरदहस्त मस्तकावरी ।
धन्य झाले मम जीवन जगाभितरी ॥४॥

बाबांचा उपदेश म्या मनीच ठसावला ।
मन आकळूनि आचरणात आणला ॥५॥

मुखी साईनाम श्रद्धा सबुरीची आठवण ।
जीवन-कृतार्थ जयसिंग नाचे आनंदाने ॥६॥

—श्री. जयसिंग वागरे.
६६, पटेल वाडी,
ग. द. आंबेकर मार्ग,
परळगाव, मुंबई ४०००१२.

# मुखी घास देणार

सदैव माझ्या शिरावरी ठेवा पित्याची पाखर
तुम्हांविण कोण माझ्या मुखी घास देणार ॥धृ.॥

गुणगान तुझे सामवेद गाती
हवी रे चराचरा तुझीच नाती

वाट चुकल्या वाटसरूला तुझ्या छायेचा आधार
तुम्हांविण कोण माझ्या मुखी घास देणार ॥१॥

पथापथावर खोटी मृगजळे
माया, ममता दूर वळवळे

मुखवट्यांची इथे भ्रमंती नको फसवा बाजार
तुम्हांविण कोण माझ्या मुखी घास देणार ॥२॥

रोमरोमी मम साई ललकारे
आता न मजला दूर किनारे

जीवनाच्या सरतेपणी तुझा दिसावा दरबार
तुम्हांविण कोण माझ्या मुखी घास देणार ॥३॥

—श्री. प्रकाश विठ्ठल परब-
२१।१६ वरळी, बी. डी. डी. चाळ,
मुंबई ४०० ०१८.

# अमुची राजधानी

शिरडी आमुची राजधानी
चक्रवर्ती श्री साई सद्गुरु

पाही चौदा भूवनी ... ॥धृ.॥

इंद्रपूरी परि वैभव इथले
शशी मित्रांचे तेज विराजे
देव देवता या नगरीला

नमती स्वर्गातूनी ... ॥१॥

अति आवडते विराजण्याला
हृद सिंहासन या सद्गुरुला
आतुर होती पंचारतीला

पंचप्राण नयनी ... ॥२॥

साई भक्तीला उधाण येते
तनु मनाला भुरळ घालते
दर्शन व्याकूळ शक्ति करते

साई जगन्मोहिनी ॥३॥

—श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी.
लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

★ ★ ★

# अगाध तव लीला

(कोल्हापूरचे साईभक्त श्री. स. व्यं. कुलकर्णी यांच्या पत्नी व सौ. नीलम देशपांडे यांच्या मातोश्री सौ. सुशिला सदाशिव कुलकर्णी या दि. १५–१–१९८४, मकर संक्रांती दिवशी साईचरणी विलीन झाल्या. तत्पूर्वी ९ तारखेस म्हणजे सोमवारी पहाटे श्री बाबांनी त्यांना स्वप्नात त्यांच्या उशाशी बसून "बाळ आता मी तुला बरे करतो काळजी करू नकोस." असे सांगितले व त्यानंतर शेवटपर्यंत त्या 'मला बरे वाटते' असे म्हणत आणि खरोखरच वेदना कमी कमी होऊन साईबाबांचे तस्वीरीकडे पहात पहातच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

या प्रसंगास अनुलक्षून त्यांनी केलेली ही कविता. श्री. कुलकर्णी यांचाही लेख या अंकात इतरत्र छापला आहे.)

हे करुणाकर, साईनाथ,
अगाध तव लीला ॥
तुज वाचुनी नसे दुजा आधार
या अज्ञ बालिकेला ॥धृ.॥

जन्मदात्री ती सोडूनी गेली
पावली तव पदाला ।
देऊनि दृष्टांता तू चमत्कृति केली
ती विसरली यातनेला ।
नाही घरघर, खोंसी न उचकी
हासत–हासत आली तव सेवेला
अगाध तव लीला ... ॥१॥

दिधलेस अहेवपण तिजला ।
तू देशील रे सद्गतीच तिजला ।
देशील निजठायी ठाव ही तिजला ।
परंतु देवा, आता कोण म्हणेल 'लाडकी'
या अज्ञ बालिकेला ॥२॥

खचितचो मी अपराधी म्हणूनी
झाले वंचित मातृसुखाला ।
परी कृपासिंधु तू होऊनी तारी,
करी बंधमुक्त मजला ।
मज घेई बा आलिंगूनी
दृढ करी तव पदाला ।
अगाध तव लीला ॥३॥

—सौ. नीलम दीपक देशपांडे
११३९, 'ई' साईक्स इक्सटेंशन,
कोल्हापूर.

# साई तुझ्या दर्शना

तळमळतो जीव माझा
साई तुझ्या दर्शना ॥
नित्यवाटे शिरडीस यावे ।
तुझ्या दर्शनाला ॥धृ.॥
दर्शनासी मुकलो तुझीया ।
जाण रे तपाला ॥धृ.॥
काय सांग चुकले माझे ।
घडवण्या वियोगा ॥धृ.॥
हिन, दिन, म्णूहणी मजला ।
विसरलासी का रे ॥धृ.॥
सोड, सोड रुसवा आता ।
नेई शिरडीला ॥धृ.॥
हात धरूनि लिहवीसी जैसा ।
नेई मज तैसा ॥धृ.॥
मशिदमाई आमुचि आई ।
भेटवी पदांना ॥धृ॥
तळमळतो जीव माझा ।
देशी कधी दर्शना ॥

—श्री. नथुराम दादाजी जोशी
मु. पो. केळवा रोड, ता. पालघर, जि. ठाणे.

# साईश्लोक

मना साई पन्थेची जावे । नित्य साई रूपे रमावे
नाही चिंता नाही कष्ट । साई दर्शने होतील नष्ट ॥१॥

नको द्वैत अद्वैताचा वाद । साई परमेश्वर सत्य
मना होवू नको विचल । जप नाम तिन्ही काळ ॥२॥

काशी पंढरी रामेश्वर । तिन्ही तीर्थे तिथे सिद्ध
आता विचार नको अन्य । शिर्डीस जाता होशील धन्य ॥३॥

असे शिर्डी क्षेत्र सुंदर । गुरुस्थान असे पवित्र
द्वारकामाईत निवास । चावडी असे विश्रांतिस्थान ॥४॥

लेंडीबागेत विहार । भिक्षेस्तव ग्राम संचार
झाले साईचरणी पवित्र । अवघे शिर्डी भूक्षेत्र ॥५॥

इथे आहे समाधिस्थान । तिथेच बसूनी करी ध्यान
देतील बाबा दृष्टांत । सत्य निरंतर हेच जाण ॥६॥

सदा सज्जनांचा मेळावा । होतो अहोरात्र सोहळा
पुऱ्या होतील मनोकामना । नष्ट होतील अन्य व्यथा ॥७॥

साईनाम असे प्रबळ । तरूनी गेले कित्येक दुर्बल
चराचर जड चेतन । अवघे साईमय जगत ॥८॥

साई शिव साई राम । स्मरणे उद्धरती पतीत
धन्य झाले शिरडीग्राम । साईचे हे पुण्य धाम ॥९॥

मना साई पंथेची जावे । शुद्ध भाव असू द्यावे
नित्य साई पूजन करावें । भव सागरी तरुन जावे ॥१०॥

—सौ. शकुंतला शंकर जगतकर
१९—१६२ उन्नत नगर, बि. २,
गोरेगांव (पश्चिम) मुंबई ४०० ०६२

# शिरडीला जायाचे

शिर्डीला जायाचे, तिथे मला राह्याचे ।
साई, साई, साई गायाचे
साई, साई, साई ध्यायाचे ॥धृ.॥

"मी" पणाचे बंधन ।
"अहं" पणाचे इंधन ।
धुनीत मला जाळायाचे ।
साई, साई, साई गायाचे ।
साई, साई, साई ध्यायाचे ॥१॥

विवेक वैराग्याचे वन ।
अखंडित अनुसंधान ।
साईरूप जगी पाह्याचे ।
साई, साई, साई गायाचे ॥
साई, साई, साई ध्यायाचे ॥२॥

साई माझा कृष्ण ।
मी त्याची राधा ।
राधाकृष्ण मला व्हायाचे ।ह्या
साई, साई, साई गायाचे ।
साई, साई, साई ध्यायाचे ॥३॥

—श्री. अनिल केशवराव रसाळ.
२१।३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वार्टर्स
रेनॉल्डर्स रोड, वडाळा (पूर्व),
मुंबई ४०० ०३७.

★

# साईमुळे भाग्य उजळले

**********************

या कमलेचे भाग्य उजळले ।
साई माझ्या देव्हाऱ्यात रमले ॥
आळवित होते मी साई भजनी ।
आज मला ते सौख्य लाभले ।
या कमलेचे भाग्य उजळले ॥१॥

प्रेम भरूनी मी साईला बघितले ।
सुख, दुःखाच्या अश्रूंनी साई चरण धुतले ।
दोन हस्त, तिसरे मस्तक आहे बाबा
तुम्हीच मजला हे सर्व शिकविले ।
या कमलेचे भाग्य उजळले ॥२॥

व्यथा मनाची आता सरली ।
घर आणि जननिंदेची भीती नुरली ।
राम नामाने जसे पाषाण तरले ।
तसे साई सागरी मी तरले तरले ।
या कमलेचे भाग्य उजळले ॥३॥

—सौ. कमल रामदास इंगळे.
द्वारा : पी. आर. टोंगे, जोशी वाडी,
गोपाल नगर, नागपूर.

# तुजवीण साई मज कोण पाही !

तुच माझा पिता अन् तूच माझी आई ।
तुजविण साई मज कोण पाही ॥धृ.॥

नको देऊ मजला संसाराभिलाषा ।
नको पाडू पदरी माझ्या निराशा ।
मन माझे राहो निरंतर तुझ्या ठायी ।
तुजविण साई मज कोण पाही ॥१॥

विवंचना पाठीची ही सरेना ।
तव नामस्मरणी मन ही रमेना ।
कृपा करोनी मज चरणी ठाव देई ।
तुजविण साई मज कोण पाही ॥२॥

तुजविण तारेल कोण मज अनाथा ।
तव चरणकमली ठेविते मी मम माथा ।
घडू द्यावे चिंतन सर्वकाळ बारा माही ।
तुजविण साई मज कोण पाही ॥३॥

–कु. शीला विश्वनाथ नाडकर्णी.
बी–११, नटराज सोसायटी,
रवि कंपाऊंड, ठाणे – २.

# तिन्ही त्रिकाळ

तिन्ही त्रिकाळ करू साईपूजा
प्रसन्न होईल साईनाथ कृपाळू माझा
तिन्ही त्रिकाळ करू आरती
करिती खचीतच कृपा आपणावरती

तिन्ही त्रिकाळ करू भजन
साईनाथाचे होईल दर्शन
तिन्ही त्रिकाळ करू या किर्तन
दुःख संकटे जातील पळून

तिन्ही त्रिकाळ म्हणू साईवचने
मग कळीकाळाला न भिणे
तिन्ही त्रिकाळ गाऊ साईचे गुणगान
तयाचे घरी लागती नित्य साईचे चरण

तिन्ही त्रिकाळ पोथी वाचिता
साई होईल तुमचा त्राता
तिन्ही त्रिकाळ उद जाळिता
साई होईल शांती दाता

भुकेल्या नित्य जेवण घाली
साई असे त्याचा सदा वाली.

—सौ. सुप्रभा शशीकांत पाठक.
राजाराम पाटील चाळ,
मानपाडा रोड, डोंबीवली.

## श्रीसाईलीलाचा अभिप्राय कळवा

श्रीसाईलीलाच्या अंकावर वाचकांच्या प्रतिक्रिया या संबंधीचे एक सदर सप्टेंबर ८४ अंकापासून नियमितपणे देण्याचे योजिले आहे. कृपया आपला अंकावरील अभिप्राय अगदी थोडक्यात, मोजक्याच शब्दात वाक्यात आमच्या दादर कार्यालयाकडे पाठवावा. नावासहित तो प्रसिद्ध करू.

— का. संपादक.

## साईनिकेतन मधील गुरुपौर्णिमा

संस्थानच्या दादर येथील कार्यालयात गुरुपौर्णिमेचा उत्सव गुरुवार ता. १२–७–८४ रोजी थाटाने साजरा करण्यात आला. ठीक दुपारी १२ वाजता श्रींची आरती झाली त्यावेळी शेकडो भक्त हजर होते. आरती नंतर तीर्थ–प्रसादाचे वाटप करण्यात आले. सायंकाळी ६ वाजेपर्यन्त असंख्य भाविकांनी येऊन श्रींच्या दर्शनाचा लाभ घेतला.

## साईभक्त छत्रे यांचे निधन

कल्याणचे साईभक्त संस्कृत पंडित श्री. विश्वनाथ केशव छत्रे यांचे कल्याण येथे वयाच्या ७८ व्या वर्षी १–७–८४ रोजी देहावसान झाले. त्यांनी १९७२–७४ पर्यंत श्रीसाईलीला मधून भरपूर लेखन केले आहे. त्यांचे संस्कृत भाषेवर असामान्य प्रभुत्व होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली आहेत. स्वतः पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांना २०० रु. व खास प्रशस्ती पत्र देऊन गौरव केला होता.

# साई-गीत

साईनाथ तुझी आरती करिते,
हृदयातील मी भाव अर्पिते
अहमदनगरा शिरडी ग्रामी
साईनाथ तु अवतरलासी
मंत्र बळाने धुनी प्रकटचि करिसी
साईनाथ तुझी आरती करिते ।

तळमळणाऱ्या भक्तांसाठी
सार्थक करण्या जीवनासाठी
संकटात तू धावूनी येतो
साईनाथ तुझी आरती करिते ।

–कु. कल्पना उद्धव बल्लाळ.
जी । २३, कुमार सोसायटी,
नेहरू रोड, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०५५.

## श्रीमती पार्वतीबाई रासने यांचे निधन

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे एका वेळचे माजी विश्वस्त श्री. नानासाहेब दामोदर रासने यांचे बंधू आप्पासाहेब उर्फ त्रिंबकराव दामोदर रासने यांच्या पत्नी गं. भा. पार्वतीबाई (काकू) यांना २६–५–१९८४ रोजी रात्री १०–२० वा. देवाज्ञा झाली. श्रीमती पार्वतीबाईंची आप्पासाहेबांशी झालेली सोयरीक श्री साईनाथ महाराजांच्या आज्ञेने झालेली होती हे विशेष होय.

श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवोत.

श्रीसाई सत्यनारायण पूजा कथा

# श्रीसाई उदी-गंगा पूजन

(लेखक - श्री. वसंत विष्णू उर्फ आबा पणशीकर. प्रकाशक - श्री. एस्. एम्. तानावडे, ताडदेव बुक डेपो, प्रकाशन, ५ सोनावाला बिल्डिंग मुं. ७, किंमत २ रु. पृष्ठे ३२).

आपल्या मनातील कोणतीही इच्छा पुर्ण झाल्यावर साईभक्त श्रीसाई सत्यनारायणाची मनोभावे पुजा करतात या प्रसंगी श्री साई उदीचे व श्री साईतीर्थाचेही म्हणजे श्रीसाई गंगेचे ही पूजन करतात. या छोटेखानी पुस्तकात श्रीसाई सत्यनारायणाचे पूजन यथोचित सोपस्कारासहित प्रथम पासून तो थेट शेवटपर्यंत १ ते ३९ क्रमांकाने व पाच अध्यायात व्रतकथा अभंगात दिलेली आहे. ती खरोखरीच वाचनीय आहे. तसेच या सत्यनारायण पूजे बरोबरच श्रीसाई उदी व श्रीसाई गंगा म्हणजे तीर्थ पुजेचेही महत्व विषद केले आहे. शेवटी फलश्रुती, बाबांची आरती, प्रार्थना व मंत्र पुष्पांजली ही देण्यात आलेली आहे. मुख पृष्ठावरील व मलपृष्ठावरील चित्र जाधव मास्तरांनी रेखाटलेले आहे. प्रत्येक साईभक्ताने हे पुस्तक आपल्या संग्रहात ठेवावे.

88 88 88

# सिंधुलहरी

(गीत रचना - श्री. दा. र. दळवी, प्रकाशक - सुप्रकाश प्रकाशन, सुनिकेतन ब्लॉक नं. १, तहसील कचेरी नजिक, कणकवली, जि. सिंधुदुर्ग, पृष्ठे ६८ किंमत ६ रु.).

श्रीसाईलीलाचे एक गुणी कवी श्री. दा. र. दळवी यांच्या एकंदर ५७ कवितांचा हा संग्रह अक्षयतृतीयेच्या दिवशी कोकणातील कळसुली हायस्कूलच्या रौप्य महोत्सवात अध्यक्षांचे शुभहस्ते प्रकाशित करण्यात आला. या काव्य संग्रहात भक्ति सुमने, भावपुष्पे, भावतरंग, वात्रटिका, चक्कांकिका इ. काव्य-साहित्याच्या प्रकारातील कविता दिलेल्या आहेत. यावरून श्री. दळवी यांची भावात्मकता व रसिकता दिसून येते. गणपती, तुळजाभवानी, साईनाथ व श्रीकृष्ण यांचेवर त्यांनी काही कविता केलेल्या बहारीच्या आहेत, तर कोकण दर्शन मधील ६ कवितांतून चितारलेली कोकणातील दृश्ये मोठी मोहक वाटतात. काव्य संग्रहाचे नावाला साजेसे सिन्धुदुर्ग किल्ल्याचे रेखाचित्र मुख पृष्ठावर असल्याने काव्य संग्रहाला आणखीनच साज चढला आहे. एक चांगला दर्जेदार काव्य संग्रह मराठी साहित्याला दिल्याबद्दल आम्ही श्री. दळवी यांचे मनापासून कौतुक करतो.

\- साईनन्द

# श्रीसाईबाबा संस्थान, शिष्यवृत्ती

श्री साईबाबा संस्थान शिरडी यांचेकडून सन १९८४ करीता गरीब व हुशार अशा पात्र ठरणाऱ्या विद्यार्थींना शिष्यवृत्ती वाटप करावयाचे आहे.

तरी इयत्ता १०वी (नवीन एस. एस. सी.) वा त्यापुढील कोणत्याही महाविद्यालयीन तसेच कोर्सेसच्या परीक्षेत शेकडा ६० टक्के किंवा त्याहून जास्त गुणसंख्या असणाऱ्या विद्यार्थींनी आपल्या शैक्षणिक संस्थेमार्फत संस्थानचे ठराविक नमुन्यातील अर्ज पाठवावेत.

अर्जाची प्रत श्री साईबाबा संस्थान, शिरडी, ता. – कोपरगाव, जि. – अहमदनगर यांचेकडे मोफत मिळतील, पोस्टाने पाहिजे असल्यास स्वतःचा पत्ता असलेले ५० पैशांचे तिकीट लावलेले पाकीट अथवा ५५ पैशांची पोस्टाची तिकीटे पाठविल्यास मिळतील.

छापील अर्ज मागविण्याची अंतीम मुदत ३१–८–१९८४ तर अर्ज स्विकारण्याची अंतीम मुदत १५–९–१९८४ अशी आहे.

मुदतीनंतर आलेल्या किंवा अपुरी माहिती असलेल्या तसेच वरील अटी पूर्ण होत नसलेल्या अपात्र अर्जावर विचार केला जाणार नाहीं व त्याबाबत पत्रव्यवहारही केला जाणार नाहीं.

(क. हि. काकरे).
न्यायालयधारक,
श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी


फोन :– २१४६७

**भारत होमिओ फार्मसी**

टिळक चौक, बेळगाव ५९०–००२.

**भारतीय औषधांबरोबर ओरिजनल सीलड**
**जर्मन, अमेरिका व स्विजरलंड या देशांची**
**होमिओपॅथिक टिंक्चर्स पेटंट व**
**बाराक्षार औषधे माफक दरामध्ये**
**मिळण्याचे एकमेव विश्वासार्ह**
**ठिकाण!**

# शिरडीवृत्त माहे मे १९८४


या महिन्यात श्री साईबाबांचे दर्शनासाठी बाहेरगावची भक्त मंडळी फार मोठ्या संख्येने आली होती. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली – ती खालील प्रमाणे –

**कीर्तन** :– (१) ह. भ. प. प्रमिला दत्तात्रय पैठणकर.
(२) ह. भ. प. लक्ष्मण आनंदा मिरजकर.


**प्रवचन** :– (१) ह. भ. प. विश्वनाथ महाराज, सुराळे.
(२) ह. भ. प. चंद्रकांत उमाकांत बेल्हेकर, पुणे.

**भजन, गायन, वादन वगैरे** :– (१) श्रीसंत मुक्ताआई भजनी मंडळ, सोलापूर. (२) श्रीसंकीर्तन सम्राट आर इंद्रदासजी, सिकंदराबाद. (३) श्री. बी. सत्यनारायण. (४) श्री. आय. व्यंकटराव, विशाखापट्टण. (५) टी. श्रीरायलू, हैद्राबाद. (६) श्री. दत्तात्रय विठ्ठल घाग, मुंबई. (७) एस्. राजू नायकर, घाटकोपर. (८) श्री. एकनाथ जयराम घाग, ठाणे. (९) श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी, कोल्हापूर. (१०) श्री. नंदकिशोर पुरोहित, मुंबई. (११) श्री. ए. एम. मनुजा. (१२) सौ. ज्योती ए. मनुजा. (१३) कु. मीना ए. मनुजा. (१४) श्री. चांद ए. मनुजा. (१५) श्री. महेश ए. मनुजा. (१६) श्री. सुरेश व्ही. दंडे, नागपूर. (१७) श्री. गोदावर गंगवानी. (१८) विद्या बी. मखीजा. (१९) सुधा सुरेंद्रराव सापनेकर, देवळाली. (२०) श्री. के. टी. टिकू (२१) जैश्री टिकू. (२२) श्री. पोपटराव गोपाळ दुधवडे, सावळीविहिर. (२३) हरेशर कान्हो, दादाराम केशव आरेकर, मुरबे. (२४) नलिनी कपिलदास दवे, भावनगर. (२५) दिव्यानंद नाथन, भोपाळ. (२६) राज्यसम्राट थिएटर्स भजनी मंडळ, कोल्हापूर. (२७) श्री. विनायक काशिनाथ गुप्ते, कर्जत. (२८) श्री. दिवानंद लाथन, भोपाळ.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काहीं नाहीं पहाटे हवा आल्हादकारक असते.



श्री साईनाथ रुग्णालय जुनी इमारत विस्तारीत कक्ष व बाजूला रुग्णांच्या नातेवाईकांना उतरण्याच्या सोयीसाठी अतिथी कक्ष.



श्री साईनाथ रुग्णालयाच्या विस्तारीत कक्षाचे उद्घाटन झाले त्यावेळेचे छायाचित्र

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

| | | | |
|---|---|---|---|
| ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०—५० | ३—०० |
| श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५—२५ | ३—०० |
| शिरडी गाईड | इंग्रजी | १—५० | ३—०० |
| ,, | मराठी | १—५० | ३—०० |
| शिरडी गाईड | गुजराथी | १—५० | ३—०० |
| ,, | हिंदी | छपाई चालु | आहे. |
| रुद्राध्याय | मराठी | ०—९० | ३—०० |

श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०—०० प्रत्येकी प्रत १—००

(व्ही. पी. ची पद्धत नाहीं)

| अ क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १—६५ | ३—०० |
| २) | ,, | १०"×१४' | १—१० | ३—०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०—५५ | ३—०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०—२० | ३—०० |
| ५) | ,, | २"×३" | ०—१५ | ३—०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १—६५ | ३—०० |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १—६५ | ३—०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २—७५ | ३—०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १—०० | ३—०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १—१० | ३—०० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०'×१४" | ०—८५ | ३—०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो , | ९'×१२' | १—१० | ३—०० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२' | १—६५ | ३—०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०—७५ | ३—०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६—०० | ८—०० |

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, **वडाळा**, मुंबई ३१, **संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे**, साई निकेतन, डॉ. **आंबेडकर** रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई१४